




पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक २९८ ■ शुक्रवार, दि. ८ मे २०२६ ■ मुल्य ५ रुपये ■ पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/2012/49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com


## अमरावती विभागीय मंडळ इयत्ता 10 वीचा निकाल जाहीर

# मुलींची पुन्हा एकदा बाजी !

प्रतिनिधी ८ मे

**अकोला :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या अमरावती विभागाचा इयत्ता १० वीचा (एसएससी) निकाल आज जाहीर झाला. या परीक्षेत अमरावती विभागातील जिल्ह्यांनी समाधानकारक कामगिरी केली असून नेहमीप्रमाणेच मुलींनी मुलांच्या तुलनेत सरस निकाल नोंदवला आहे. अकोला जिल्ह्याचा एकूण निकाल ९०.७४ टक्के लागला आहे. येथे एकूण २५,६८८ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती, ज्यापैकी २३,०६४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. अमरावती विभागात मुलींचे उत्तीर्ण होण्याचे प्रमाण मुलांपेक्षा जास्त आहे. उदाहरणार्थ, अकोला जिल्ह्यात मुलांच्या ८६.९६ टक्के निकालाच्या तुलनेत मुलींचा निकाल ९४.९४ टक्के इतका लागला आहे. अकोला जिल्ह्यात ६,२२३ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळवले असून ७,१९७ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. विद्यार्थ्यांना त्यांच्या गुणांची पडताळणी किंवा उत्तरपत्रिकेची छायाप्रत हवी असल्यास ९ मे ते २३ मे २०२६ या कालावधीत मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज करता येईल.



### पातूर तालुक्याचा सर्वाधिक निकाल

जिल्हात पातूर तालुक्याचा सर्वाधिक निकाल लागला. ९४ टक्के विद्यार्थी येथे उत्तीर्ण झाले. तर अकोला तालुक्यात ९२ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले. जिल्ह्यात २३ हजार विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून ११,६३७ मुल आणि ११,४२७मुली उत्तीर्ण झाल्यात.

## निदा खानला लपवून ठेवणारा कोण ?

प्रतिनिधी ८ मे

**नाशिक :** नाशिकमधील बहुचर्चित टीसीएस धर्मांतर आणि लैंगिक शोषण प्रकरणातील मुख्य आरोपी निदा खान हिच्या अटकेनंतर आता अत्यंत धक्कादायक माहिती समोर आली आहे. गेल्या ४० दिवसांपासून फरार असलेल्या निदा खानला छत्रपती संभाजीनगरमध्ये लपवून ठेवण्यासाठी एमआयएमचे नगरसेवक मतीन पटेल यांनी मदत केल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले आहे. याप्रकरणी नाशिक पोलिसांनी मतीन पटेल यांना नोटीस बजावली असून त्यांचा मोबाईलही जप्त केला आहे.

## दहा वर्षांच्या मुलीवर अत्याचार करणाऱ्या

# नराधमाला जंगलातून बेड्या



प्रतिनिधी ८ मे

**अकोला:** सावरगाव (ता. पातूर) येथील एका १० वर्षांच्या चिमुकलीवर अत्याचार करून फरार झालेल्या ६० वर्षीय नराधमाला अकोला पोलिसांनी गुरुवारी (७ मे) सावरगावच्या घनदाट जंगलातून अटक केली. डोंगरदऱ्या आणि काट्याकुट्यांच्या जंगलात सलग दोन दिवस पायदळ मोहीम राबवून पोलिसांनी आरोपीला शोधून काढले. ५ मे रोजी फिर्यादी व तिचे पती मजुरीसाठी गेले असताना, आरोपी जगराम गोविंद आडे (वय ६०, रा. सावरगाव) याने १० वर्षीय पीडित मुलगी घरात एकटी असल्याचे पाहून तिच्यावर अत्याचार केला. कोणाला सांगितल्यास जीवे मारण्याची धमकीही दिली. पीडितेने घडलेला प्रकार आईला सांगितल्यानंतर चान्नी पोलीस स्टेशनमध्ये आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता.

आरोपी सराईत असून त्याला जंगलाची पूर्ण माहिती होती. त्याच्याकडे मोबाईल किंवा वाहन नसल्याने त्याला तांत्रिक पद्धतीने शोधणे अशक्य होते. घटनेचे गांभीर्य ओळखून पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी तातडीने शोध घेण्याचे आदेश दिले.सहाय्यक पोलीस अधीक्षक निखील पाटील आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शंकर शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली अकोला पोलीस दलातील १०५ कर्मचाऱ्यांची ५ वेगवेगळी पथके तयार करण्यात आली. या मोहिमेत २ श्वान पथक आणि ४ ड्रोन कॅमेऱ्यांच्या साहाय्याने सावरगाव, चोंडी, वनदेव, वसाली आणि पांगरटाटी या भागातील २० ते २५ कि.मी.च्या घनदाट जंगलात शोधमोहीम राबवण्यात आली. ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी, निखील पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शंकर शेळके, विजय जाधव, रविंद्र लांडे, विष्णू बोडखे व स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने यशस्वीरित्या पार पाडली.

# विभागात कोकण अव्वल तर छत्रपती संभाजीनगर पिछाडीवर

प्रतिनिधी ८ मे

**पुणे :** राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इयत्ता दहावी) परीक्षेचा निकाल शुक्रवार, ८ मे रोजी जाहीर झाला आहे. बारावीप्रमाणे दहावीतही मुलींनीच निकालात बाजी मारली आहे. हा निकाल १ वाजताऐवजी ११.३० वाजताच आनलाईन जाहीर करण्यात आला. यामध्ये राज्यात कोकण विभाग अव्वल असून, त्याचा निकाल ९७.६२ टक्के लागला आहे तर छत्रपती संभाजीनगरचा निकाला सर्वात कमी म्हणजे ८८.४१ टक्के लागला आहे. दहावीच्या परीक्षेत राज्यातील ९२.०९ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. मुंबई, कोल्हापूर, पुणे, नागपूर, नाशिक, लातूर, छत्रपती संभाजीनगर, अमरावती व कोकण या नऊ विभागीय मंडळांमधून एकूण १५ लाख ५५ हजार ०२६ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी १५ लाख ४२ हजार ४७२ विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ट झाले असून त्यांपैकी १४ लाख २० हजार ४८६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. एकूण उत्तीर्णतेची टक्केवारी ९२.०९ आहे.

नऊ विभागांतर्फे यंदा दहावीची परीक्षा २० फेब्रुवारी ते १८ मार्चदरम्यान घेण्यात आली

**विभागनिहाय टक्केवारी**

| | |
|---|---|
| कोकण | ९७.६२ |
| कोल्हापूर | ९५.४७ |
| मुंबई | ९४.९७ |
| पुणे | ९४.२४ |
| नाशिक | ९०.५३ |
| अमरावती | ९०.५० |
| नागपूर | ८९.०७ |
| लातूर | ८८.४२ |
| संभाजीनगर | ८८.४१ |

### मुलीच हुश्शार... दहावीत मुलींची बाजी

दहावीच्या निकालात यंदाही मुलींनी बाजी मारली आहे. यंदा मुली उत्तीर्ण होण्याची टक्केवारी ९४.९६ टक्के असून मुलांच्या उत्तीर्णतेची टक्केवारी ८९.५६ टक्के एवढी आहे. मुलांच्या तुलनेत मुली उत्तीर्ण होण्याची टक्केवारी ५.४० ने जास्त आहे. विभागीय मंडळांमध्ये कोकण विभागाचा सर्वाधिक ९७.६२ टक्के निकाल लागला आहे.

### बारावीनंतर दहावीच्या निकालातही घट

निकालात मुलांपेक्षा मुलींच्या उत्तीर्णतेचे प्रमाण जास्त आहे. ८९.५६ टक्के मुले उत्तीर्ण झाले असून, ९४.९६ टक्के मुली उत्तीर्ण झाल्या आहेत. गेल्यावर्षी ९४.१० टक्के निकाल लागला होता.

### राज्यातील १७९ विद्यार्थ्यांना पैकीच्या पैकी गुण

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे (राज्य मंडळ) घेण्यात आलेल्या दहावीच्या परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आला. यंदा राज्यातील १७९ विद्यार्थ्यांनी पैकीच्या पैकी गुण मिळवल्याचे समोर आले आहे. सर्वाधिक १०४ विद्यार्थी लातूर विभागातील आहेत.

## तामिळनाडूचे राजकारण महाराष्ट्राच्या वळणावर...

# विजय थलपतींच्या तोंडचा घास काढला जाणार !

प्रतिनिधी ८ मे

**चेन्नई :** गेल्या दोन दिवसांपासून तामिळनाडूत सुरु असलेल्या राजकीय नाट्यात एक मोठा ट्विस्ट येण्याची शक्यता आहे. तामिळनाडू विधानसभा निवडणुकीत थलपती विजय यांचा तमिळगा वेत्री कळघम अर्थात टीकेव्ही पक्षाला सर्वाधिक १०८ जागा मिळाल्या होत्या. मात्र, बहुमतासाठी आवश्यक असलेल्या ११८ या संख्याबळाची अद्याप जुळवाजुळव न करता आल्याने थलपती विजय यांच्या हातातोंडाशी आलेला मुख्यमंत्रिपदाचा घास हिरावून घेतला जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यादृष्टीने तामिळनाडूत अशक्यप्राय अशी राजकीय समीकरणे आकाराला येणार असल्याची जोरदार चर्चा सुरु आहे.

तामिळनाडूत विजय थलपती यांनी राज्यपालांची दोनवेळा भेट घेऊन सत्तास्थापनेचा दावा केला होता. मात्र, या दोन्ही वेळेस राज्यपाल राजेंद्र अर्लेकर यांनी विजय यांना आधी ११८ आमदारांच्या पाठिंब्याचे पत्र सादर करा, मग मी सत्तास्थापनेचे निमंत्रण देतो, अशी भूमिका घेतली होती. TVKed पक्षाने तामिळनाडू विधानसभा निवडणुकीत सर्वाधिक १०८ जागा जिंकल्या आहेत. तामिळनाडूच्या २३४ जागांच्या विधानसभेत बहुमत सिद्ध करण्यासाठी ११८ च्या संख्याबळाची गरज आहे. काँग्रेसच्या पाच आमदारांनी टीव्हीकेला पाठिंबा दिला आहे. त्यामुळे या दोघांचे एकत्रित संख्याबळ ११३ इतके झाले आहे. परंतु, विजय थलपति दोन मतदारसंघातून निवडून आल्यामुळे टीव्हीकेचे प्रत्यक्ष संख्याबळ १०७ इतकेच मोजले जाईल.



### हाडवैरी येणार एकत्र!

टीव्हीकेची हीच अडचण ओळखून आता तामिळनाडूच्या राजकारणात द्रमुक आणि अण्णाद्रमुक या हाडवैऱ्यांनी एकत्र येण्याची तयारी सुरु केल्याची चर्चा आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, द्रमुकच्या पाठिंब्यानं अण्णाद्रमुक पक्ष सत्ता स्थापन करु शकतो. अण्णाद्रमुकने स्टॅलिन यांच्याकडे पाठिंबा मागितल्याचे सांगितले जाते. डीएमकेने गुरुवारी बैठक घेऊन सर्व राजकीय निर्णय घेण्याचे अधिकार एम.के. स्टॅलिन यांना दिले आहेत. त्यामुळे अण्णाद्रमुकच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. अण्णाद्रमुकचे नेते पलानीस्वामी आज राज्यपालांना भेटण्याची शक्यता आहे. यावेळी किती आमदारांच्या पाठिंब्याचे पत्र राज्यपाल राजेंद्र अर्लेकर यांच्यासमोर सादर करणार, हे बघावे लागेल.

# इम्तियाज जलील यांची चौकशी करा - संजय शिरसाट

**निदा खानला छ. संभाजीनगरमधून अटक**

प्रतिनिधी ८ मे

**छ. संभाजीनगर :** नाशिकमधील टीसीएस कंपनीतील लैंगिक शोषण आणि धर्मांतर प्रकरणात मोठी घडामोड समोर आली आहे. महिला कर्मचाऱ्यांचे शोषण, सक्तीने धर्मांतर करण्याचे प्रयत्न, धार्मिक भावना दुखावणे, विनयभंग आणि मानसिक छळ यांसंदर्भात दाखल करण्यात आलेल्या नऊ गुन्ह्यांची एसआयटीमार्फत चौकशी सुरू आहे.छत्रपती संभाजीनगर येथून नाशिक गुन्हे शाखा आणि छत्रपती संभाजीनगर पोलिसांच्या संयुक्त पथकाने तिला छत्रपती संभाजीनगरमधील नरेगाव परिसरातील कैसर कॉलनीतील एका फ्लॅटमधून ताब्यात घेतले आहे. आता निदा खान अटकेनंतर सामाजिक न्याय मंत्री व शिवसेना



शिंदे गटाचे नेते संजय शिरसाट यांनी एमआयएमचे माजी खासदार इम्तियाज जलील यांच्यावर गंभीर आरोप केला आहे.

संजय शिरसाट म्हणाले की, काल संभाजीनगरमधून नाशिक पोलिसांनी नाशिक धर्मांतरप्रकरणी निदा खान या मुख्य आरोपीला अटक केली. मार्चमध्ये ही घटना घडली होती. निदा खान दीड-दोन महिने कुठे होती हे माहीत नाही. निदा खान संभाजीनगरमध्ये अशा परिसरात लपली होती, जो झोपडपट्टी एरिया आहे. तिथे अमली पदार्थांचे धंदे चालतात. ही खान एकटी नव्हती तर तिची आई आणि मावशी तिच्या सोबत होती. तिला एमआयएमने सहकार्य केले. एमआयएमचे माजी खासदार इम्तियाज जलील यांनी मागे सुद्धा त्या संदर्भात उघडपणे वक्तव्य केले होते आणि एका अर्थाने तिला पाठिंबा दर्शविला होता. इतरही ठिकाणी एमआयएम त्यांच्या हालचाली वाढवत आहेत. धर्मांतर करणे, मुलींना फसवणे हे सगळे प्रकार एमआयएमच्या नेतृत्वात होतात. निदा खान हा एक मोहरा आहे. त्यांचे महाराष्ट्रभर जाळे पसरले आहे. पुणे, संभाजीनगरसह सगळीकडे असे प्रकार पाहायला मिळतील. हिंदुंचा द्वेष करण्याचे प्रकार सुरू आहेत, असा आरोप त्यांनी केला. संजय शिरसाट पुढे म्हणाले की, मी मुख्यमंत्र्यांना भेटून या प्रकरणी एसआयटी चौकशीची मागणी करणार आहे. मुख्य सूत्रधार कोण? याचा शोध लागला पाहिजे. २२ ते ३० वर्षांच्या दरम्यानच्या तरुणांना असे प्रशिक्षण दिले जाते.

# राजभवनात भाजपचे एजंट बसलेत !

प्रतिनिधी ८ मे

**मुंबई :** तामिळनाडूतील सत्ता स्थापनेच्या घडामोडींवरून शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी राज्यपाल आणि भाजपवर जोरदार निशाणा साधला आहे. माध्यमांशी संवाद साधताना त्यांनी टीव्हीके पक्षाला सरकार स्थापनेसाठी संधी देण्याची मागणी करत राज्यघटनेचा उल्लेख केला. 'टीव्हीकेचे १०८ आमदार निवडून आले आहेत. राज्यघटनेनुसार सर्वात मोठ्या पक्षाला प्रथम सत्ता स्थापनेसाठी बोलावले जाते आणि त्यानंतर विधानसभेत बहुमत सिद्ध करावे लागते,' असे संजय राऊत म्हणाले. यावेळी त्यांनी महाराष्ट्रातील पहाटेच्या शपथविधीचा उल्लेख करत तत्कालीन राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्यावरही टीका केली. 'त्या वेळी बहुमत पाहिले होते का?' असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

तसेच, 'राजभवनात भाजपचे एजंट बसले आहेत. नाव लोकभवन असले तरी लोकांच्या भावनांची



हत्या तिथे होते,' अशी जहरी टीकाही त्यांनी केली. तामिळनाडूचे राज्यपाल राजेंद्र विश्वनाथ आर्लेकर यांच्यावर निशाणा साधत 'त्यांना संविधानाचे धडे दिले पाहिजेत,' असेही राऊत म्हणाले. दरम्यान, टीव्हीके पक्षाच्या यशावर भाष्य करताना त्यांनी सांगितले की, 'अवघ्या दोन वर्षांत टीव्हीकेने तामिळनाडूत मोठं यश मिळवत प्रस्थापित पक्षांना धक्का दिला आहे.' मात्र महाराष्ट्रात अशा प्रकारची राजकीय क्रांती का होत नाही, या प्रश्नावर बोलताना त्यांनी बाळासाहेब ठाकरे यांच्या जुन्या वक्तव्याची आठवण करून दिली. याशिवाय, पश्चिम बंगालमधील राजकीय परिस्थितीवर बोलताना त्यांनी ममता बॅनर्जी यांच्या आंदोलनाला इंडिया आघाडीचा पाठिंबा असल्याचे सांगितले.







**CLASSIFIED**

**पाहिजे**

पार्ट टाईम अँड फुल टाईम जॉब करीता मुले पाहिजेत...!

१) मार्केटिंगसाठी ३ मुले (२ व्हिलर, आणि मोबाईल आवश्यक) वेळ ९ ते ५

२) माल पोहचवायला २ मुले

-:संपर्क:-

**आदिराज इंटरप्रासेस**

प्लॉट नं. ५०७

नमुना गल्ली नं. ४

राजकमल चौक, अमरावती

मो. 7028286766


# राष्ट्रवादीचा निर्धार पक्का ! 'होय मुख्यमंत्रीच' !

प्रतिनिधी ८ मे

**बारामती :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या प्रमुख नेत्या तथा राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी २०२९ च्या निवडणुकीनंतर राज्याचं नेतृत्व करावं, त्या राज्याच्या मुख्यमंत्री व्हाव्यात, अशी इच्छा त्यांचे पुत्र जय पवार यांनी व्यक्त केली. जय पवार यांनी माध्यमांसमोर अशी इच्छा व्यक्त केल्यानंतर राजकारणात




विविध चर्चांना उधाण आलं आहे. विविध नेत्यांकडून जय पवार यांच्या वक्तव्यावर प्रतिक्रिया दिली जात आहे. भाजप नेते तथा ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी जय पवार यांना त्यांच्या वक्तव्यावरुन टोला लगावला आहे. मुख्यमंत्री होण्यासाठी आमदारांचं पाठबळ लागतं, असा टोला जयकुमार गोरे यांनी लगावला आहे. तसेच शिवसेनेचे मंत्री भरत गोगावले यांनीदेखील जय पवार यांना टोला लगावला आहे. सुनेत्रा पवार पोटनिवडणुकीत जास्त मताधिक्याने निवडून आल्यामुळे जय पवार यांना तसे स्वप्न पडू लागले असतील, असा टोला भरत गोगावले यांनी लगावला आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट विविधा

शुक्रवार, दि.८ मे २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

मे महिन्याच्या सुरवातीपासूनच, खरेतर एप्रिल महिन्याच्या शेवटच्या आठवडयापासूनच महाराष्ट्राच्या विविध भागात पाणी टंचाईच्या झळा सुरू झाल्या आहेत. काही अपवाद वगळता ग्रामीण भागापासून तर विकसीत शहरापर्यंत कोणाचीही या टंचाईतून सुटका होण्याची शक्यता दिसत नाही. मुंबई-कोल्हापूर शहरामध्ये आत्ताच पाणी टंचाईचा निर्णय घेण्यात आला आहे.



# पाणी टंचाईचे भीषण वास्तव



मे महिन्याच्या सुरवातीपासूनच, खरेतर एप्रिल महिन्याच्या शेवटच्या आठवडयापासूनच महाराष्ट्राच्या विविध भागात पाणी टंचाईच्या झळा सुरू झाल्या आहेत. काही अपवाद वगळता ग्रामीण भागापासून तर विकसीत शहरापर्यंत कोणाचीही या टंचाईतून सुटका होण्याची शक्यता दिसत नाही. मुंबई-कोल्हापूर शहरामध्ये आत्ताच पाणी टंचाईचा निर्णय घेण्यात आला आहे. एकंदरीत दरवर्षी प्रमाणेच यंदाही पाचवीला पुजल्याप्रमाणे महाराष्ट्रातील जनता गंभीर दुष्काळाने होरपळत आहे. पिण्याच्या पाण्याचा थेंब नाही, पिण्यासाठी लोक गाव सोडताहेत. जे गावात आहे तेच जंगलात आहे. माणसे-जनावरे पाण्या-चाऱ्या वाचून तडफडत आहेत.

मध्यंतरी प्रसार माध्यमातून एक बातमी वाचावयास मिळाली. 'माकडाच्या पिल्लाची तहानेतून तडफड-तांब्यात अडकले डोके'. या बातमीनुसार एक माकडीन पिल्लाला घेवून जवळच्या वस्तीत घुसली आणि तांब्यात पाण्याचा थेंब दिसताच त्या पिल्लाने तांब्यात तोंड घातले पिल्लाचे तोंड तांब्यात अडकले. पिल्लू सैरवैर फिरत राहीले. माकडीनीने पिल्लाला वाचविण्याचा प्रयत्न केला. शेवटी नागरिकांच्या व वन विभागाच्या अधिकारी कर्मचाऱ्यांच्या प्रयत्नाने पिल्लाचा जीव वाचला. ही एका माकडीनीची किंवा पिल्लाची गोष्ट नसून ही महाराष्ट्राच्या जनतेची गोष्ट आहे. स्पष्टच सांगायचे तर महाराष्ट्राच्या जनतेचेच माकड झाले आहे. आपण निवडून दिलेल्या राज्यकर्त्यांनी आपले माकड केले आहे. यंदाचा दुष्काळ किती भयानक आहे. हे या दुष्काळात होरपळून निघणारी जनता अनुभवत आहे.

एकंदरीत सालाबादाप्रमाणे यंदाही महाराष्ट्र होरपळत आहे. राहील. महिला जीव धोक्यात घालून विहीरीत उतरत राहतील. शेतकरी करपलेल्या पिकाकडे बघत राहतील. या वर्षी तरी चांगला पाऊस यावा असे ईश्वराकडे साकडे घालतील मे-जून महिना संपेल. पाऊस पडला की जुन्या यातना विसरायच्या व परत दुष्काळ पडला तर तडफडत बसायचे या चक्रात किती वर्ष अडकून राहायचे? या दुष्काळात तडफडून मेला नाही तर पुढच्या दुष्काळात हमखास मरण आहेच ही परिस्थिती बदलणे काळाची गरज आहे.

गेल्या वर्षी महाराष्ट्रात बंधारे फुटेपर्यंत पाऊस झाला. तेथे काही महिन्यातच या टंचाईची सर्वाधिक भीषणता जाणवावी, यासारखा दैवविलास नाही. ज्या राज्याच्या बहुसंख्य भागात अतिवृष्टी झाल्यानंतरही पाण्यासाठी वणवण फिरण्याची वेळ नागरिकांवर कां यावी हा प्रश्नच आहे. सध्याच्या आणिबाणीच्या अवस्थेत राज्यकर्त्यांनी जनतेला विश्वासात घेणे फार गरजेचे आहे. शासन आपल्या पाठीशी आहे हा विश्वास जनतेमध्ये निर्माण होण्याकरिता शासनाने काही कठोर निर्णय घेणे अपरिहाय आहे.

चेन्नईमध्ये काही वर्षापुर्वी भीषण पाणी टंचाई निर्माण झाली होती व पाण्याकरिता तेथील जनता त्रस्त होती. प्रशासनाव्दारे त्यावर तातडीची उपाययोजना करीत सर्व इमारतीवर 'रेन वाटर हारवेस्टींगची' कडक अंमलबजावणी करण्यात आली होती. महाराष्ट्र शासनाच्या वतीने या संदर्भात जोरदार मोहीम राबविण्यात येवून त्याची कडक अमंलबजावणी करण्यात आल्यास इमारतीवर पडणाऱ्या पावसाच्या पाण्याची शहरातील पाणी टंचाईच्या समस्येवर मात करण्यासाठी मोठी मदत होणार आहे.

महाराष्ट्रात दरवर्षी जीतका पाऊस पडतो त्याच्या केवळ दहा हक्के पाउस इङ्गनाईल मध्ये पडतो. परंतू आज परिस्थिती अशी आहे की महाराष्ट्र आज तहानेसाठी व्याकुळ आहे व तिकडे इझाईल मध्ये हिरवीगार शेती फुलत आहे. इझाईलच्या शेतीचे हे वैभव पाहाण्याकरिता आपले अनेक बडे राजकीय नेते, मंत्री, प्रगतीशील शेतकरी, उद्योगपती अभ्यास दौऱ्याच्या गोंडस नावाखाली जातात. परंतू त्यांच्या या अभ्यासाचा (न केलेल्या) आपल्याकडे कवडीचाही फायदा दिसून येत नाही. करीता या सरकारी अभ्यास दौऱ्याचे थेर थांबविण्यात येवून पाणी संवर्धनासाठी कठोर व काटेकोर उपाय योजना राबविण्यात याव्यात. पाणी टंचाई दुष्काळाची चाहूल लागल्या नंतरच सरकारला जाग येते आणि पाउस संपल्यावर सर्व घोषणा हवेत विरतात. ही मानसिकता बदलली नाही तर दुष्काळ मुक्तीच्या घोषणाही भाषणापूर्तीच राहतील.

सध्याच्या भीषण दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर फडणवीस सरकारची कसोटीची वेळ असून महत्प्रयासाने-जनतेच्या आशीर्वादाने मिळालेल्या सत्तेचा उपयोग राज्याला परत एकवार सुजलाम सुफलाम करण्याकरिता व राज्यातील समस्त जनेतला खऱ्या अर्थाने अच्छे दिन दाखवण्याकरीता सार्थकी लावायचा आहे.

प्रकाश घवघवे
नागपूर
मो. ९८८१७२३३६३

## महिला संरक्षण कायदे व अंमलबजावणी

भारतात महिलांच्या आणि मुलींच्या संरक्षणासाठी अनेक कडक कायदे आणि घटनात्मक तरतुदी करण्यात आल्या आहेत. या कायद्यांचा मुख्य उद्देश महिलांना निर्भय वातावरण देणे, त्यांना समान हक्क मिळवून देणे आणि त्यांचे हिंसाचारापासून संरक्षण करणे हा आहे. या कायद्यात प्रामुख्याने कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंध कायदा, २००५, लैंगिक अत्याचारापासून बालकांचे संरक्षण अधिनियम, २०१२, कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई व निवारण) कायदा, २०१३, हुंडा प्रतिबंधक कायदा, १९६१, बालविवाह प्रतिबंधक कायदा, २००६, अश्लीलताविरोधी कायदा, १९८७, भारतीय दंड संहिता १८६० जो आता भारतीय न्याय संहिता, २०२३ झाला आहे, फौजदारी कायदा (सुधारणा) कायदा, २०१८ इत्यादी महत्त्वाचे कायदे आहेत.

या कायद्यांची कडक व प्रामाणिक अंमलबजावणी करण्यासाठी पोलीस व विशेष कक्ष, महिला हेल्पलाईन, पोलीस ठाण्यांमध्ये महिला कक्ष, दामिनी पथक, राष्ट्रीय व राज्य महिला आयोग, संरक्षण अधिकारी, वन स्टॉप सेंटर, महिलांवरील गुन्ह्यांचा तपास जलद गतीने करण्यासाठी विशेष न्यायालयांची स्थापना अशा यंत्रणा कार्यरत आहेत. तरीही महिलांवरील अन्याय अत्याचारात वाढ होत आहे कारण अशा घटनांबाबत पोलिस यंत्रणा व न्यायव्यवस्थेत उदासीनता असून गतिशीलतेचा अभाव आहे. त्यामुळे या कायद्यांची परिणामकारक व प्रभावी अंमलबजावणी होत नाही. तसेच बऱ्याच प्रकरणात राजकीय हस्तक्षेप वाढला असल्याने तपास यंत्रणेद्वारे गुन्हेगारांना अभय मिळते ही अत्यंत निंदनीय बाब आहे.

# 'अशा पोलिसांवर कडक कारवाई काळाची गरज...!'

**महाराष्ट्र बदनाम झाला :** छत्रपती शिवाजी महाराजांच्या महाराष्ट्रात स्त्रियांवरील अत्याचार, बलात्कार, कौटुंबिक हिंसाचाराच्या घटना सतत वाढत असून एप्रिल-मे २०२६ मध्ये तर यात मोठी वाढ झाली आहे. विशेषतः पुणे, नाशिक आणि मुंबईसारख्या शहरांत लैंगिक अत्याचार, घरगुती हिंसाचार आणि अल्पवयीन मुलींवरील अत्याचाराच्या वाढत्या घटना चिंताजनक आहेत. नुकत्याच नरसापूर, अकोला जिल्ह्यात पातूर तालुक्यातील आणि मुळशीत घडलेल्या लहान मुलींवरील अत्याचाराच्या घटनांनी मानवतेला काळीमा फासला असून संपूर्ण महाराष्ट्र बदनाम झाला आहे. ही महाराष्ट्र सरकारसाठी फार शरमेची आणि लाजिरवाणी गोष्ट आहे. पण याबद्दल कोणालाच फारशी खंत वाटत नाही. कारण गेंड्याची कातडी पांघरलेले राजकारणी निष्ठूर झाले असून सारेच फक्त सत्तेत मश्गूल झाले आहेत.

पातूर तालुक्यातील लहान मुलीवर बलात्कार प्रकरणाची तक्रार नोंदवून घेण्यास हलगर्जीपणा व विलंब केल्यामुळे गुन्हेगार फरार झाल्याचे वृत्त वाचून अत्यंत संताप येणे साहजिक आहे. कारण पोलिसांची बेफिकीर वृत्ती व कर्तव्यात कसूर करून पैसे घेऊन गुन्हेगारांना संरक्षण देण्याचे प्रमाण वाढले आहे, त्यामुळे गुन्हेगारी वाढत असल्याचे स्पष्ट झाले आहे.

**पोलिस यंत्रणा व न्यायालयांची भूमिका :** समाजातील गुन्हेगारीवर प्रतिबंध घालण्यासाठी पोलिसांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते पण ही यंत्रणाच भ्रष्ट व संशयास्पद झाली आहे. त्यामुळे या यंत्रणेत पैसे घेऊन गुन्हेगारांना संरक्षण देणाऱ्यांची संख्या वाढली आहे.

पातूर तालुक्यातील १० वर्षीय मुलीवरील अत्याचार प्रकरणातील आरोपी पोलिसांच्या हलगर्जीपणामुळे फरार झाल्याचे वृत्त असून पोलिसांनीच आरोपीला पळून जाण्याची संधी दिल्याचे आणि पिडित मुलीची तक्रार नोंदवून घेण्यास ५ तासाचा विलंब केला गेल्याचे वृत्त आहे. यावरून कायद्याच्या संरक्षणासाठी आणि लोकांच्या सुरक्षिततेसाठी निर्माण केलेली यंत्रणाच गुन्हेगारांना संरक्षण देत असेल तर गुन्हेगारी वाढणारच असेच म्हणावे लागेल. एकीकडे पोलिस यंत्रणेची भूमिका संशयास्पद झाली आहे तर दुसरीकडे न्यायव्यवस्थेत देखील न्यायासाठी अतिविलंब होतो. तारीख पे तारीख देऊन प्रकरण वर्षानुवर्षे प्रलंबित ठेवले जाते. त्यामुळे महिला व मुली कंटाळून जातात आणि त्यांना न्याय मिळेल याची कोणतीही खात्री नसते. कारण न्यायालयात वाळल्या सोबत ओलेही जळते, खऱ्याचे खोटे होण्याची दाट शक्यता असते असे म्हटले जाते.

अनेक प्रकरणात काही सन्माननीय अपवाद वगळता वकील फक्त पैशासाठी कायद्याचा कीस पाडतात आणि कायद्यातील पळवाटा शोधून गुन्हेगारांना वाचविण्यासाठी आपल्या पेशाची नैतिकता गहाण ठेवून गुन्हेगारांसाठी आपली वकील पणाला लावतात. कधी कधी तर ते न्यायाधिशांनाही मॅनेज करण्याचा प्रयत्न करून गुन्हेगारांना निर्दोष सिद्ध करतात. परिणामी कायदे आहेत पण त्यांची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणेतील बहुतांश लोकं प्रामाणिक नाहीत ही फार मोठी खंत आहे.

**पोलिसांवर कडक कारवाई गरजेची :** पातूर तालुक्यातील अत्याचार प्रकरणी पोलिसाची भूमिका संशयास्पद असल्याचे सिद्ध झाले. या पोलिसांनी आपल्या खात्याच्या 'सद्रक्षणाय खलनिग्रहणाय' या ब्रीदवाक्याला काळीमा फसला. त्यामुळे शासनाने पोलीस कायदा, १८६१, महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ इत्यादी कायद्यात आवश्यक त्या सुधारणा करून गुन्हा घडल्यानंतर पोलिसांनी तातडीने कारवाई करावी.

प्रा.डॉ.एम.आर.इंगळे,
संविधान प्रचारक तथा
विभागीय सचिव डाटा अकोला.

# मानवतेची अखंड ज्योत : जागतिक रेड क्रॉस संस्था

मानवजातीच्या इतिहासात युद्धे, नैसर्गिक आपत्ती, रोगराई, दुष्काळ आणि विविध संकटांनी नेहमीच माणसाच्या अस्तित्वासमोर मोठे प्रश्न उभे केले आहेत. अशा संकटांच्या काळात मानवतेच्या रक्षणासाठी काही संस्था आणि व्यक्ती देवदूतासारख्या धावून येतात. जगभरात दुःख, वेदना आणि संकटात सापडलेल्या लोकांना आधार देणाऱ्या अशाच महान चळवळीचे नाव म्हणजे रेड क्रॉस होय. दरवर्षी ८ मे हा दिवस 'जागतिक रेड क्रॉस दिन' म्हणून साजरा केला जातो. हा दिवस मानवतेची सेवा, सहानुभूती, करुणा आणि निःस्वार्थ वृत्ती यांचे स्मरण करून देणारा दिवस आहे. रेड क्रॉस चळवळीचे संस्थापक हेन्री ड्युनाँ यांच्या जन्मदिनानिमित्त हा दिवस जगभर साजरा केला जातो. त्यामुळे या दिवसाला ऐतिहासिक, सामाजिक आणि मानवी दृष्टिकोनातून विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

मानवतेच्या सेवेसाठी समर्पित असलेल्या रेड क्रॉस चळवळीचा इतिहास अत्यंत प्रेरणादायी आहे. १८५९ साली इटलीतील सोल्फेरिनो येथे फ्रान्स आणि ऑस्ट्रिया यांच्यात भीषण युद्ध झाले. या युद्धात हजारो सैनिक जखमी झाले होते. युद्धभूमीवर जखमी सैनिक वेदनेने तडफडत होते, परंतु त्यांच्यासाठी पुरेशी वैद्यकीय मदत उपलब्ध नव्हती. त्या वेळी स्वित्झर्लंडचे व्यापारी आणि समाजसेवक हेन्री ड्युनाँ तेथे उपस्थित होते. त्यांनी ही भीषण परिस्थिती पाहिली आणि त्यांचे मन व्यथित झाले. त्यांनी स्थानिक लोकांना एकत्र करून जखमी सैनिकांना मदत करण्यास सुरुवात केली. 'टुट्टी फ्रेटेली' म्हणजे 'आपण सर्व भाऊ आहोत' हा संदेश देत त्यांनी मानवतेची एक नवीन दिशा जगासमोर ठेवली.

या अनुभवातून प्रेरित होऊन हेन्री ड्युनाँ यांनी 'अ मेमरी ऑफ सोल्फेरिनो' हे पुस्तक लिहिले. या पुस्तकामध्ये त्यांनी युद्धातील अमानुष परिस्थितीचे वर्णन केले आणि युद्धग्रस्तांसाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर स्वयंसेवी मदतसंस्था स्थापन करण्याची कल्पना मांडली. त्यांच्या या विचारांना जगभरातून प्रतिसाद मिळाला आणि १८६३ साली आंतरराष्ट्रीय रेड क्रॉस समितीची स्थापना झाली. पुढे १८६४ मध्ये जिनिव्हा करार झाला आणि युद्धातील जखमी सैनिकांच्या संरक्षणासाठी काही आंतरराष्ट्रीय नियम निश्चित करण्यात आले. याच क्षणापासून रेड क्रॉस चळवळीचा जागतिक प्रवास सुरू झाला.

रेड क्रॉसचे कार्य केवळ युद्धापुरते मर्यादित नाही. नैसर्गिक आपत्तींच्या काळातही ही संस्था मोठ्या प्रमाणावर मदतकार्य करते. भूकंप, पूर, चक्रीवादळ, त्सुनामी, दुष्काळ यांसारख्या संकटांच्या वेळी रेड क्रॉसचे स्वयंसेवक तातडीने घटनास्थळी पोहोचतात. तेथे अन्न, पाणी, औषधे, निवारा आणि मानसिक आधार उपलब्ध करून देतात. अनेक वेळा अशा परिस्थितीत सरकारी यंत्रणाही अपुऱ्या पडतात, परंतु रेड क्रॉसचे स्वयंसेवक जीवाची पर्वा न करता मदतकार्य सुरू ठेवतात. त्यामुळे लाखो लोकांचे प्राण वाचतात आणि त्यांना नवजीवन मिळते. आरोग्य क्षेत्रामध्ये रेड क्रॉसचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. रक्तदान चळवळीमध्ये या संस्थेची भूमिका विशेष उल्लेखनीय आहे. जगभरात रक्तदान शिबिरे आयोजित करून लाखो रुग्णांना जीवनदान देण्याचे कार्य रेड क्रॉस करत आहे. आजही अपघात, शस्त्रक्रिया किंवा विविध आजारांमुळे अनेक रुग्णांना रक्ताची गरज भासते. अशा वेळी रक्तदान हे सर्वांत मोठे दान मानले जाते. रेड क्रॉसने समाजात रक्तदानाविषयी जागृती निर्माण केली आहे. 'रक्तदान हेच जीवनदान' हा संदेश या संस्थेने प्रभावीपणे लोकांपर्यंत पोहोचवला आहे.

कोविड-१९ महामारीच्या काळात रेड क्रॉसने दिलेली सेवा संपूर्ण जगाने अनुभवली. त्या कठीण काळात लाखो लोकांना अन्न, औषधे, ऑक्सिजन आणि वैद्यकीय मदत उपलब्ध करून देण्यात रेड क्रॉसने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. भारतात रेड क्रॉस चळवळीची स्थापना १९२० साली झाली. भारतीय रेड क्रॉस सोसायटीने देशभरात विविध सामाजिक, आरोग्यविषयक आणि आपत्ती व्यवस्थापनाचे उपक्रम राबवले आहेत. ग्रामीण आणि दुर्गम भागांमध्ये आरोग्य सेवा पोहोचवणे, रक्तदान शिबिरे आयोजित करणे, प्राथमिक उपचारांचे प्रशिक्षण देणे आणि आपत्तीग्रस्तांना मदत करणे ही या संस्थेची प्रमुख कामे आहेत. पूर, भूकंप, दुष्काळ आणि चक्रीवादळांसारख्या संकटांच्या वेळी रेड क्रॉसने दिलेली मदत लोकांसाठी अत्यंत महत्त्वाची ठरली आहे.

महाराष्ट्रातही रेड क्रॉसचे कार्य मोठ्या प्रमाणावर सुरू आहे. पूरग्रस्त भागांमध्ये मदतकार्य, आरोग्य शिबिरे, रक्तदान मोहिमा आणि विद्यार्थ्यांसाठी जनजागृती कार्यक्रम आयोजित करून ही संस्था समाजात सकारात्मक परिवर्तन घडवून आणत आहे. ग्रामीण भागात प्राथमिक उपचारांचे प्रशिक्षण देऊन अनेकांचे जीव वाचवण्यास मदत होत आहे. आजच्या काळात आपत्ती व्यवस्थापनासाठी प्रशिक्षित स्वयंसेवकांची गरज वाढत आहे आणि रेड क्रॉस या क्षेत्रात प्रभावीपणे कार्यरत आहे.

जागतिक रेड क्रॉस दिन साजरा करण्यामागे केवळ संस्थेच्या कार्याचा गौरव करणे हा उद्देश नाही, तर समाजामध्ये मानवतेची भावना रुजवणे हा त्यामागील मुख्य हेतू आहे. आजच्या युगात विज्ञान आणि तंत्रज्ञानाने प्रचंड प्रगती केली असली तरी मानवी संवेदनशीलता अनेक ठिकाणी कमी होताना दिसते. स्वार्थ, स्पर्धा आणि भौतिकवादाच्या या काळात माणूस माणसापासून दूर जात आहे. अशा परिस्थितीत रेड क्रॉससारख्या संस्था मानवतेचे महत्त्व अधोरेखित करतात.

आज जगभरात युद्ध, दहशतवाद, हवामान बदल आणि महामारी यांसारखी अनेक आव्हाने निर्माण झाली आहेत. लाखो लोक विस्थापित होत आहेत, अनेकांचे जीवन उद्ध्वस्त होत आहे. अशा परिस्थितीत रेड क्रॉससारख्या संस्थांची गरज अधिक तीव्रतेने जाणवते. जागतिक रेड क्रॉस दिन हा मानवतेच्या मूल्यांची आठवण करून देणारा अत्यंत महत्त्वाचा दिवस आहे. हेन्री ड्युनाँ यांनी सुरू केलेली ही चळवळ आज जगभरातील लाखो लोकांसाठी आशेचा आधार बनली आहे.

डॉ. राजेंद्र बगाटे
मानसशास्त्र अभ्यासक

## दिन विशेष

### जागतिक थॅलेसेमिया दिन

## 'एकत्र या, थॅलेसेमियाला हरवा'



दरवर्षी ८ मे हा दिवस जगभरात थॅलेसेमिया जनजागृतीसाठी 'जागतिक थॅलेसेमिया दिन' म्हणून साजरा केला जातो. या दिवसाचा उद्देश थॅलेसेमिया या आनुवंशिक रक्तविकाराबाबत समाजात जागरूकता निर्माण करणे, रुग्णांना योग्य उपचार मिळवून देणे आणि प्रतिबंधात्मक उपायांबाबत माहिती पोहोचवणे हा आहे.

थॅलेसेमिया हा रक्तातील हिमोग्लोबिन तयार होण्यातील दोषामुळे होणारा आनुवंशिक आजार आहे. या आजारामुळे शरीरात पुरेशा प्रमाणात निरोगी लाल रक्तपेशी तयार होत नाहीत. परिणामी रुग्णामध्ये रक्ताची कमतरता, अशक्तपणा, थकवा, वाढ खुंटणे आणि इतर शारीरिक समस्या निर्माण होतात. गंभीर प्रकारातील रुग्णांना नियमित रक्त चढवावे लागते.

**थॅलेसेमियाचे प्रकार –** १) थॅलेसेमिया मायनर – रुग्ण सामान्य जीवन जगू शकतो, परंतु तो आजाराचा वाहक असतो. २) थॅलेसेमिया मेजर – गंभीर प्रकार असून रुग्णाला नियमित रक्तदान आणि उपचारांची गरज असते.

**थॅलेसेमियाची लक्षणे –** १)सतत थकवा आणि अशक्तपणा २)चेहरा फिकट दिसणे ३)वजन व उंचीची वाढ मंदावणे ४)श्वास घेण्यास त्रास ५)वारंवार ताप येणे

**प्रतिबंध हाच सर्वोत्तम उपाय** - थॅलेसेमिया हा आनुवंशिक आजार असल्यामुळे विवाहपूर्व रक्त तपासणी करणे अत्यंत आवश्यक आहे. जर मुलगा आणि मुलगी दोघेही थॅलेसेमिया मायनर असतील, तर त्यांच्या अपत्याला थॅलेसेमिया मेजर होण्याची शक्यता जास्त असते. त्यामुळे विवाहपूर्व तपासणी आणि समुपदेशनाद्वारे हा आजार मोठ्या प्रमाणात टाळता येऊ शकतो.

**उपचार आणि काळजी –** १)नियमित रक्त संक्रमण २)आयर्न कमी करण्यासाठी औषधोपचार ३)योग्य आहार आणि वैद्यकीय सल्ला

**समाजाची भूमिका**

थॅलेसेमिया रुग्णांना सतत रक्ताची आवश्यकता असते. त्यामुळे स्वेच्छा रक्तदान ही मोठी सामाजिक जबाबदारी आहे. समाजातील प्रत्येकाने रक्तदानासाठी पुढे येऊन थॅलेसेमिया रुग्णांना आधार द्यावा.

## साहित्यिक, लेखकांना आवाहन

**दैनिक सिटी न्यूज सुपरफास्ट** आता आठ पानांसह वाचकांना उपलब्ध होत आहे. अंकातील विविधा पानासाठी अकोला शहर तसेच जिल्ह्यातील साहित्यिक, लेखक, कवी यांनी त्यांचा मजकूर **८३९०६७०९९९** या **व्हॉटसअप** क्रमांकावर पाठवावा.

त्याला यथायोग्य प्रसिद्धी दिली जाईल. या अंकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

सिटी न्यूज अकोला

शुक्रवार, दि.८ मे २०२६

http://epaper.citynewssuperfast.com

## जनगणनेच्या पहिल्या टप्प्यात नगराध्यक्षा माया धुळे यांचा सहभाग

**अकोट :** अकोट नगर परिषद क्षेत्रात जनगणनेच्या पहिल्या टप्प्यात घरयादी व घरगणना प्रक्रिया १६ मे ते १४ जूनदरम्यान राबविण्यात येणार आहे. या मोहिमेत प्रगणक घरोघरी भेट देऊन मोबाईल ॲपच्या माध्यमातून नागरिकांची माहिती संकलित करणार आहेत. या पार्श्वभूमीवर नगराध्यक्षा माया धुळे यांनी स्वगणना ॲपमध्ये स्वतःची माहिती भरून जनगणनेत सक्रिय सहभाग नोंदविला. यावेळी गटनेते रवी ठाकुर, पाणीपुरवठा सभापती अमोल पालेकर, नगरसेविका शुभांगी टेमझरे यांच्यासह अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

जनगणना ही देशाच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण प्रक्रिया असून नागरिकांनी प्रगणकांना आवश्यक माहिती देऊन सहकार्य करावे, असे आवाहन नगराध्यक्षा माया धुळे यांनी यावेळी केले.

# यापुढे महापुरुषांचा अपमान खपवून घेणार नाही : गुलाबराव गावंडे

## बहुजन समाज जागृती महासंघाच्या निषेध कृती सभेत गुलाबराव गावंडे यांचा इशारा

प्रतिनिधी ८ मे

**अकोला :** यापुढे महापुरुषांचा अपमान सहन करणार नाही असा इशारा माजी मंत्री गुलाबराव गावंडे यांनी दिला. बहुजन समाज जागृती महासंघाच्या निषेध कृती सभेत ते बोलत होते.

प्रमिलाताई ओक सभागृहात झालेल्या सभेच्या व्यासपीठावर महासंघाचे अशोक अमानकर, हभप प्रकाश महाराज ताकोते, डॉ. पुरुषोत्तम तायडे, विजय कौसल, सुभाष सातव, रमेश तायडे, अनिल शिंदे, केशवराव पातोंड, डॉ. रणजित कोरडे, राम मुळे, डॉ. आशा मिरगे, पुरुषोत्तम आवारे, निळोबा ढोरे, डॉ. शंकरराव




वाकोडे, प्रकाश भागवत, शशिकांत गायकवाड, ॲड. अनिल लव्हाळे, रेणू गावंडे, देवा गावंडे, शिवोहम महाराज उपस्थित होते. यावेळी मंचावर उपस्थित सर्व मान्यवरांना शिवाजी कोण होता हे पुस्तक भेट देण्यात आले.

महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज आणि बहुजन महापुरुषांच्या विरोधात बोलणार नाही, अशी चोख व्यवस्था उभारणार असल्याचा इशारा माजी गुलाबराव गावंडे यांनी दिला. गुरूवारी रात्री झालेल्या निषेध सभेमध्ये मराठा सेवा संघ, अखिल भारतीय माळी महासंघ, मराठा महासंघ, बौद्ध समाज महासंघ, महात्मा फुले समता परिषद, कुणबी समाज मंडळ, धनगर समाज महासंघ, मातंग समाज महासंघ, सार्वजनिक भीमजयंती उत्सव समिती, परीट समाज महासंग, गोंधळी समाज मंडळ, कास्ट्राईब संघटना, कुंभार समाज महासंघ, चर्मकार समाज मंडळ, कुंभार समाज महासंघ, बेलदार समाज मंडळ, अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समिती, तेली समाज मंडळ, कोळी समाज महासंघ, झिंगाभोई समाज मंडळ, आदिवासी समाज संघटना, बेलदार समाज महासंघ, न्हावी समाज मंडळ, छावा संघटना, जिजाऊ ब्रिगेड, संभाजी ब्रिगेड, महाराष्ट्र राज्य उर्दू शिक्षक संघटना, बामसेफ, राष्ट्रीय चर्मकार महासंघ, दिव्याज्ञान महिला बहुद्देशीय संस्था ह्या संघटनांनी बहुजन समाज जागृती महासंघाच्या यापुढील सर्व उपक्रमांना पाठिंबा जाहीर केला.

## अकोल्यात रेती माफियांना कोणाचे अभय

प्रतिनिधी ८ मे

- पूर्णा नदी पात्रात ३०-४० फूट खोल उत्खनन
- शेतकऱ्यांच्या जमिनी नदीत कोसळण्याच्या मार्गावर

**अकोला :** जिल्ह्यात रेती माफियांनी अक्षरशः धुमाकूळ घातला असून, आता शेतकऱ्यांच्या अस्तित्वाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. मौजे कटयार येथील पूर्णा नदीच्या रेती घाटावर नियम धाब्यावर बसवून अतोनात अवैध उत्खनन सुरू आहे.



धक्कादायक बाब म्हणजे, हे उत्खनन चक्क ३० ते ४० फूट खोलीपर्यंत केले जात असून, यामुळे लगतच्या शेतकऱ्यांच्या शेतजमिनी नदी पात्रात खचू लागल्या आहेत. पूर्णा नदी पात्रातून जेसीबी आणि पोकलेन मशीनच्या साहाय्याने दिवस-रात्र रेती उपसा सुरू आहे. यामुळे शेताची दरड कोसळत असल्याचे पाहून जेव्हा हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांनी ठेकेदाराला रोखण्याचा प्रयत्न केला, तेव्हा त्यांनाच 'आमच्या नादाला लागू नका, परिणाम वाईट होतील' अशी थेट धमकी देण्यात आली. रेती माफिकांची ही मुजोरी पाहून परिसरात संताप व्यक्त होत आहे. शेतकऱ्यांनी या गंभीर प्रकाराबाबत जिल्हाधिकारी कार्यालयात तक्रार अर्ज दाखल केला आहे. पावसाळा तोंडावर असल्याने जर ही दरड कोसळली, तर उभ्या पिकांसह शेतजमीन नदी पात्रात वाहून जाण्याची भीती व्यक्त होत आहे. शेतकऱ्यांनी आता थेट सरकारकडे नुकसान भरपाईची मागणी केली असून, या अवैध उपशावर त्वरित बंदी घालून कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. अन्यथा, रोषाचा उद्रेक होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## न्यू इंग्लिश हायस्कूल, अकोलाची यशाची परंपरा कायम

**अकोला :** माध्यमिक शालांत परीक्षा मार्च २०२६ मध्ये न्यू इंग्लिश हायस्कूल अकोलाने दर वर्षी प्रमाणे या वर्षीही यशाची परंपरा कायम राखत घवघवीत यश संपादन केले. परीक्षेला एकूण १७० विद्यार्थी बसले होते त्यातून १५३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून ९० टक्के निकाल लागला आहे. प्रफुल्ल फुलसिंग चव्हाण ह्याला ९३.४०३ गुण घेऊन शाळेतून प्रथम आला. द्वितीय क्रमांक विराज सुभाष जणबंधु याने ९१.००टक्के घेऊन पटकवला. शाळेतून तृतीय क्रमांकाची मानकरी कु प्रीती ज्ञानदेव काकडे हिने ८९.०० टक्के गुण घेऊन पटकविला. तसेच मोहित संदीप घोडेस्वार ८८.८०टक्के नियमित अभ्यास, भरपूर सराव तसेच शाळेतील ग्रंथालयचा वापर हि त्रिसूत्री यशाचे गमक ठरल्याचे शाळेचे मुख्याध्यापक माधव मुनशी यांनी सांगितले. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे या वर्षी शाळेच्या एकूण ४३ विद्यार्थ्यांनी अभ्यासासोबात शालेय क्रिडांगणावर नियमित सराव करून क्रीडा क्षेत्रात विभागीय व राज्यस्तरावर चमकदार कामगिरी करत क्रीडा गुण सवलतीचे अतिरिक्त गुण मिळविलेङ यशस्वी विद्यर्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे अध्यक्ष ॲड राजेश्वर देशपांडे तसेच सर्व पदाधिकारी,मुख्याध्यापक श्री.माधव मुनशी , उपमुख्याध्यापक उदय हातवळणे, पर्यवेक्षक हेमंत ओझरकर, कु. अलका मुंढे, एसएससी परीक्षा प्रमुख मिलिंद घोगले शिक्षक तथा शिक्षेकेतर कर्मचारी यांनी केले.

## रेल्वे चालकाच्या तत्परतेने वाचले वृद्धाचे प्राण !

**अकोला :** शहरापासून जवळच असलेल्या गांधीग्राम ते उगवा फाटादरम्यान रेल्वे रूळावर एक काळजाचा ठोका वाढवणारी घटना समोर आली आहे. चक्क एका वयोवृद्ध व्यक्तीने रेल्वे रुळावर आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला असून रेल्वे चालकाच्या कार्यतत्परतेने त्याचा जीव वाचला आहे. ही घटना घडली आहे अकोला-अकोट मार्गावर धावणाऱ्या डेमू रेल्वे मार्गावर. गुरूवारी सकाळी ९ वाजून ४० मिनिटांनी अकोटवरून अकोलाकरिता डेमू रेल्वे निघाली. रेल्वेने वेग पकडताच अचानक रेल्वे ड्रायव्हरला गांधीग्राम ते उगवा रेल्वे रुळावर एक वयोवृद्ध व्यक्ती आत्महत्या करण्यासाठी झोपला असल्याचे दिसून आले.

## एटीएममध्ये हातचलाखी ; कार्ड बदलून खात्यातून 1 लाख रुपये लंपास

### गोरक्षण मार्गावरील इन्कम टॅक्स चौकातील प्रकार

**अकोला :** शहरातील इन्कम टॅक्स चौक परिसरात एटीएममध्ये मदतीच्या बहाण्याने डेबिट कार्ड बदलून एका खातेदाराच्या खात्यातून तब्बल १ लाख रुपये काढून घेतल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे.

खदान पोलीस स्टेशनमध्ये दाखल रिपोर्टनुसार, फिर्यादी हर्षवर्धन श्यामराव देशमुख (५३) रा. चक्रधर अपार्टमेंट, सहकार नगर, गोरक्षण रोड, अकोला हे खासगी कंपनीत नोकरी करतात. ते पत्नी कांचन देशमुख व दोन मुलींसह वास्तव्यास आहेत. २ मे रोजी दुपारी ते पत्नी व मोठी मुलगी वैधिका यांच्यासह निमकर्दा येथे बीए सेकंड इयरच्या परीक्षेसाठी खासगी वाहनाने गेले होते. परतीच्या प्रवासात सायंकाळी साडेचार वाजताच्या सुमारास त्यांनी

इन्कम टॅक्स चौकातील भारतीय स्टेट बँकेसमोरील एटीएमजवळ वाहन थांबविले. त्यावेळी पत्नी कांचन देशमुख




या आयसीआयसीआय बँकेच्या डेबिट कार्डद्वारे पैसे काढण्यासाठी एटीएममध्ये गेल्या. एटीएममधील 'करंट अकाउंट' व 'सेव्हिंग अकाउंट' पर्यायाबाबत संभ्रम निर्माण झाल्याने त्यांनी पती हर्षवर्धन देशमुख यांना मोबाइलवर संपर्क साधला. त्यानंतर त्यांच्या मागे उभ्या असलेल्या अंदाजे ४० वर्षीय इसमाने 'सायबर एरर येत आहे' असे सांगत मदतीच्या बहाण्याने कार्ड हातात घेतले. त्याने प्रक्रिया रह करण्यास सांगत हातचलाखीने मूळ कार्ड बदलून दुसरे कार्ड त्यांच्या हातात दिले नंतर पैसे न निघाल्याने संशय आल्यावर देशमुख यांनी कार्ड तपासले असता ते आयसीआयसीआय बँकेचे जितेंद्र कुमार नावाच्या व्यक्तीचे कार्ड असल्याचे निदर्शनास आले. दरम्यान, पांढरा टी-शर्ट परिधान केलेला संबंधित इसम तेथून पसार झाला. यानंतर फिर्यादी यांनी बँकेचे स्टेटमेंट घेऊन खदान पोलीस स्टेशन गाठत तक्रार दिली. याप्रकरणी खदान पोलिसांनी अज्ञात इसमाविरुद्ध भारतीय न्याय संहिता (BNS) कलम ३०३(२) अन्वये गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास सुरू आहे. याप्रकरणी पोलीस उपनिरीक्षक वनवे यांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, एटीएम परिसरातील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे तपास सुरू आहे.


## स्वप्नलोक किड्सची विद्यार्थिनी ज्ञानेश्वरी भोकरे मैदानी स्पर्धेत राष्ट्रीय स्तरावर विजयी

**अकोला :** मैदानी स्पर्धा फोर्थ एडिशन स्टेट लेवल ॲथलेटिक स्पर्धा नाशिक येथे पार पडली असून या स्पर्धेत स्वप्नलोक किड्स ची विद्यार्थिनी ज्ञानेश्वरी भोकरे हिने ६०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत रोप्य पदक व २०० मीटर मध्ये कांस्यपदक प्राप्त करून विजय मिळविला .या विजयी विद्यार्थिनीचा सत्कार समारंभ सोहळा संस्थापक मा. आ. श्री बळीरामजी सिरस्कार साहेब व संस्थेचे व्यवस्थापकीय अध्यक्ष मा. श्री धनंजय सिरस्कार सर तसेच संस्थेच्या उपाध्यक्षा सौ. अनुराधाताई वावकार, शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. चारूलता मुळे मॅडम, यांच्या हस्ते विजयी




विद्यार्थ्यांचा मेडल व प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला तसेच या स्पर्धेत स्वप्नलोक किड्स स्कूल येथील विद्यार्थ्यांनी क्रिडा शिक्षक करण कुंभार व क्रिडा शिक्षिका आरती शिवले यांच्या मार्गदर्शनाखाली सहभाग घेतला. आ. श्री बळीरामजी सिरस्कार सर यांनी पुढील भविष्याच्या वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

### वर्ग १० वी मधील गुणवंत विद्यार्थी



सानिया शेख ९६ टक्के | राफन अबिर ९८.४० टक्के | रुक्कियाा बछाव ९६.४० टक्के | फैसल अहमद खान ९६.६० टक्के | सोहेरा फातिमा ९८.४० टक्के

## आरोग्य क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या आरोग्य सेविकांना मिळणार फ्लॉरेन्स नाईटींगेल आरोग्य रत्न पुरस्कार

**अकोला :** महाराष्ट्र राज्य नर्सेस व आरोग्य कर्मचारी संघटनेच्या वतीने जागतिक परिचर्या दिन सोहळा व आरोग्य रत्न पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. जागतिक परिचर्या दिनाचे औचित्य साधून अकोल्या जिल्हा परिषद आरोग्य विभागात ग्रामीण भागात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या आरोग्य सेविका स्वास्थ अभ्यंगता, विस्तार अधिकारी, यांचा पुरस्कार सोहळ्याचे आयोजन १७ मे २०२६ रोजी जिल्हा प्रशिक्षण केंद्र अकोला येथे ठीक १०:०० वा. आयोजित करण्यात आले आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अकोला मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम तर प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बळीराम गाढवे हे राहणार आहेत, तसे सत्कार मूर्ती म्हणून दिगंबर लोखंडे उपमुख्य कार्यकारी अधिकारी सामान्य प्रशासन विभाग जिल्हा परिषद अकोला, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. शशिकांत पवार, माता बाल संगोपन अधिकारी डॉ. विनोद करंजीकर, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. मनीष शर्मा हे राहणार आहेत.

राज्य नर्सेस व आरोग्य कर्मचारी संघटनेचे राज्य अध्यक्ष अशोक जयसिंगपुरे साहेब हे प्रामुख्याने उपस्थित राहणार आहे. तसेच जिल्हा प्रशिक्षण अधिकारी डॉ. जयश्री बिबटे, आहे. कार्यक्रमाला जिल्ह्यातील सर्व आरोग्य कर्मचाऱ्यांनी उपस्थित रहावे असे आवाहन महाराष्ट्र राज्य नर्सेस व आरोग्य कर्मचारी संघटनेच्या जिल्हाध्यक्ष संगीता जाधव, यांनी आवाहन केले आहे.

## शिरताळा येथे 'श्रीमद् भागवत कथा व हरिनाम सप्ताहा'चे आयोजन

**मुर्तिजापूर :** तालुक्यातील शिरताळा येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही श्री महंत १००८ सिताराम महाराज यांच्या कृपेने व श्री वै. समर्थ सद्‌गुरु श्रीराम महाराज मेहुणकर यांच्या जन्म शताब्दीनिमित्त 'श्रीमद् भागवत कथा व हरिनाम सप्ताहा'चे भव्य आयोजन करण्यात आले आहे. ह.भ.प. गुरुवर्य तुकाराम सखारामपुरकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा सप्ताह हनुमान मंदिर, शिरताळा येथे पार पडणार आहे. या आध्यात्मिक महोत्सवाचा शुभारंभ शनिवार, ९ मे २०२६ (वैशाख कृ. ७) रोजी होणार असून, सांगता शनिवार, १६ मे २०२६ (वैशाख कृ. ३०) रोजी होईल. सप्ताहाचे व्यासपीठ नेतृत्व ह.भ.प. श्री ज्ञानेश्वर महाराज कळंबेश्वर हे करणार आहेत. कथेची वेळ दररोज सकाळी ८:३० ते १२:३० पर्यंत आहे. याशिवाय दररोज पहाटे ५ वाजता काकडा आरती, सायंकाळी ५ वाजता हरिपाठ आणि रात्री ८ ते १०:३० या वेळेत विविध



नामांकित कीर्तनकारांची 'हरिकीर्तन' सेवा पार पडणार आहे. सप्ताहात ह.भ.प. सोपान महाराज डिक्कर, ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज लाहुळकर, ह.भ.प. गजानन महाराज गोडचारे, ह.भ.प. हिरओम सोनोणे महाराज, ह.भ.प. गणेश कराळे महाराज, आणि ह.भ.प. अविनाश महाराज खोकले आपली सेवा अर्पण करतील. शुक्रवार, १५ मे रोजी भव्य मिरवणूक सोहळा काढण्यात येईल. शनिवार, १६ मे रोजी सकाळी १० ते ११ या वेळेत ह.भ.प. गुरुवर्य तुकाराम महाराज सखारामपूरकर यांचे काल्याचे कीर्तन होईल. त्यानंतर दुपारी १२ ते ५ वाजेपर्यंत महाप्रसादाचे वितरण करण्यात येईल. या महाप्रसादाचे अन्नदाते श्री लखन खेमराजी यादव हे आहेत.या धार्मिक कार्यक्रमाला समस्त पंचक्रोशीतील भाविकांनी बहुसंख्येने उपस्थित राहून श्रवणाचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन समस्त गावकऱ्यांनी केले आहे.

## शेगाव टी पॉइंट सिमेंट रोडवर भेगा !

**अकोला :** शहराच्या बाहेर अकोला जाणाऱ्या शेगाव टी पॉइंट या मुख्य व वर्दळीच्या सिमेंट रोडवर मोठ्या प्रमाणात भेगा पडलेल्या आहेत.

यामुळे लहान वाहनधारकांचा त्रास सहन करावा लागत आहे. तसेच दुचाकी वाहन या भेगावरून गेल्यास एखादी दुर्घटना होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या भेगांचा आकार एवढा मोठा आहे की दुचाकी वाहनाचे अख्खे जाग त्यात जाऊन बसते. त्यामुळे या रस्त्याने रात्रीच्या वेळी वाहन चालविणे धोकादायक बनले आहे.

# अकोल्यात कडक उन्हाच्या पार्श्वभूमीवर सनकूल औषधांचे वाटप

प्रतिनिधी ८ मे

**अकोला :** विदर्भासह अकोल्यात उन्हाचा पारा चांगलाच चढला असून, नागरिकांना उष्माघाताचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

या वाढत्या उन्हापासून सर्वसामान्यांचे संरक्षण व्हावे, या सामाजिक बांधिलकीतून जठारपेठ भागातील 'माऊली होमिओ क्लिनिक' च्या वतीने 'सनकूल' या प्रतिबंधात्मक औषधांच्या मोफत वाटपाचे शिबिर आयोजित करण्यात आले होते.

न्यू तापडीया नगर, राऊत वाडी, पंचशील नगर, सातव चौक, जठारपेठ येथे आयोजित या लोकोपयोगी शिबिराचे



### ॲड.गिरिश गोखले, डॉ.स्नेहा गोखले यांचा लोकोपयोगी उपक्रम

उद्‌घाटन मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडले. डॉ. स्नेहा गोखले आणि नगरसेवक ॲड. गिरीश गोखले यांच्या नेतृत्वात हे आरोग्य शिबिर संपन्न झाले. यावेळी उन्हात काम करणारे मजूर, प्रवासी आणि स्थानिक नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या सनकुल या मोफत औषधी सुविधेचा लाभ घेतला. केवळ औषध वाटपच नव्हे, तर शिबिराच्या माध्यमातून नागरिकांना उष्माघातापासून वाचण्यासाठी घ्यावयाची काळजी आणि उपचारांबाबत माहिती देण्यात आली.उष्माघाताने जास्त घाम येणे, चक्कर येणे, डोकेदुखी आणि उलट्या होणे यांकडे दुर्लक्ष करू नये. पुरेसे पाणी पिणे, गरज असेल तरच उन्हात बाहेर पडणे, टोपीचा वापर करणे आणि व्यसनांपासून दूर राहणे असा सल्ला ही देण्यात आला. भर उन्हात नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेणाऱ्या या उपक्रमाचे अकोलेकरांकडून मोठ्या प्रमाणावर कौतुक होत आहे. उन्हाळ्याच्या तीव्र झळा सोसणाऱ्या सर्वसामान्य जनतेसाठी हे 'सनकूल' औषध अत्यंत फायदेशीर ठरेल, असा विश्वास डॉ. स्नेहा गोखले यांनी यावेळी व्यक्त केला.

समर्थ शिक्षण प्रसारक मंडळ व्दारा संचालित एफ ५२२६

मॉं. गायत्री प्राथमिक शाळा व स्व. प्रकाश देशमुख माध्यमिक विद्यालय

गायत्री नगर. अकोला

आम्ही गुणवत्ता पाहून प्रवेश देत नाही तर, प्रवेश घेणाऱ्या प्रत्येकामध्ये गुणवत्ता निर्माण करतो!

वैशिष्ट्ये :
- अनुभवी शिक्षकवृंद
- सुसज्ज पायाभूत ईमारत
- दर्जेदार अभ्यासक्रमासोबत नाविण्यपूर्ण उपक्रम
- सर्व पुस्तकांनी युक्त वाचनालय
- आनंददायी शिक्षण पध्दती
- CCTV ची सुविधा
- कला, संस्कृती, क्रिडा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासावर भर
- सुसज्ज प्रयोगशाळा

इयत्ता १ ली ते १० वी साठी प्रवेश देणे सुरु आहे.
- इयत्ता १ ली ते ८ वी च्या विद्यार्थ्यांना मोफत गणवेश
- इयत्ता १ ली ते १० वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत बससेवा उपलब्ध
- शालेय पोषण आहार



मॉं गायत्री प्राथमिक शाळा व स्व. प्रकाश देशमुख विद्यालय

मो. ९९२११८६७१५, ९५११२५४९५९, ९४२१८९५७९०, ९९६०४३७३६६

# सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ

शुक्रवार, दि. ८ मे २०२६ https://epaper.citynewssuperfast.com


# प्रतिबंधित कापूस बियाण्यांचा साठा जप्त

## पळसोनीत छापा, कृषी विभाग व पोलिसांची संयुक्त कारवाई

प्रतिनिधी ८ मे




**यवतमाळ** : वणी तालुक्यातील पळसोनी येथे भारत सरकारने प्रतिबंधित केलेल्या अनधिकृत कापूस बियाण्यांची अवैध विक्री सुरू असल्याची माहिती मिळाल्यानंतर कृषी विभाग व पोलिसांनी संयुक्त कारवाई करत मोठा साठा जप्त केला आहे. या कारवाईमुळे परिसरात खळबळ उडाली असून बियाणे विक्रीतील अनियमिततेवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

या प्रकरणात अरुण शंकर भट (वय ४५, रा. पळसोनी, ता. वणी) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालय, यवतमाळ यांच्या तक्रारीवरून करण्यात आली. दि. ६ मे २०२६ रोजी रात्री सुमारे ९ ते ९.२० या वेळेत पळसोनी येथे आरोपीच्या राहत्या घरावर छापा टाकण्यात आला. कारवाईदरम्यान घराच्या विविध भागातून मोठ्या प्रमाणात अनधिकृत कापूस बियाण्यांचा साठा आढळून आला.

विविध कंपन्यांच्या नावाने पॅकिंग केलेली एकूण ८१ पाकिटे जप्त करण्यात आली. प्राथमिक तपासणीनुसार ही बियाणे प्रतिबंधित स्वरूपाची असून त्यांची विक्री शासनाच्या नियमांचे उल्लंघन करणारी असल्याचे स्पष्ट झाले आहे. जप्त मुद्देमालाची एकूण किंमत १ लाख १५ हजार ७० रुपये इतकी असल्याचे अधिकृत सूत्रांनी सांगितले. या छाप्यात "माऊली-५", "सिल्व्हर 5G", "कावेरी सीड्स 5G", "सुरक्षा", "जम्बो 5G प्रीमियम", "गॅलेक्सी हायपर", "धूम-२" अशा विविध नावांनी लेबल लावलेली बियाण्यांची पाकिटे आढळून आली. ही सर्व पाकिटे संशयास्पद असल्याने त्यांचे नमुने बीज परीक्षण प्रयोगशाळेकडे तपासणीसाठी पाठविण्यात आले आहेत. तपासणीनंतर या बियाण्यांची गुणवत्ता व वैधता स्पष्ट होणार आहे. या प्रकरणात कृषी विभागाने गंभीर दखल घेत बियाणे अधिनियम १९६८ तसेच पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ अंतर्गत विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास अविनाश चिकराम हे करीत आहेत. तपासात आणखी काही व्यक्ती किंवा पुरवठा साखळीतील घटक समोर येण्याची शक्यता वर्तवली जात आहे. या घटनेनंतर परिसरात अनधिकृत कृषी निविष्ठा विक्रीवर नियंत्रण ठेवण्यासाठी अधिक कठोर पावले उचलण्याची मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.



## आचाऱ्याला लोखंडी पाइपने मारहाण

प्रतिनिधी ८ मे

**नेर** : अमरावती महामार्गावरील एका ढाब्यावर काम करणाऱ्या आचाऱ्याला ढाबा चालक पिता-पुत्राने लोखंडी पाइपने मारहाण केल्याची घटना बुधवारी घडली. या प्रकरणी नेर पोलिसांनी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

प्रफुल्ल मधुकर रामटेके (वय ४२, रा. कोहळा पुनर्वसन, नेर) असे जखमी आचाऱ्याचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ढाबा चालक संतोष अमरपुरे (वय ५५) व त्यांचा मुलगा अंकुश अमरपुरे (रा. गांधी चौक, नेर) यांनी स्वयंपाक खोलीतील लाईट बंद करण्याच्या कारणावरून रामटेके यांच्याशी वाद घातला. वाद वाढल्यानंतर रामटेके हे दुचाकीने घरी जाण्यास निघाले असता आरोपी पिता-पुत्राने त्यांना अडवून लोखंडी पाइपने मारहाण केली.

या मारहाणीत रामटेके जखमी झाले असून त्यांच्या तक्रारीवरून नेर पोलिसांनी संतोष अमरपुरे व अंकुश अमरपुरे यांच्याविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा नोंदविला आहे. पुढील तपास पोलिस करीत आहेत.

# दोन देशी पिस्तुलांसह तरुण ताब्यात

## यवतमाळ शहरात डी.बी. पथकाची मोठी कारवाई



प्रतिनिधी ८ मे

**यवतमाळ** : शहरातील गुन्हेगारीवर आळा घालण्यासाठी सुरू असलेल्या विशेष मोहिमेंतर्गत यवतमाळ शहर पोलिसांच्या डि.बी. पथकाने मोठी कारवाई करत दोन देशी बनावटीच्या पिस्तुलांसह चार जिवंत काडतुस जप्त करून एका इसमाला अटक केली आहे. ही कारवाई नागपूर बायपासवरील इम्पिंग ग्राऊंड परिसरात करण्यात आली.

सुजीत रावसाहेब कदम (वय ४६, रा. शुभम अपार्टमेंट, संकट मोचन रोड, माईंदे चौक, हं.मु. समर्थवाडी, यवतमाळ) असे आरोपीचे नाव आहे. पोलीस स्टेशन यवतमाळ शहरच्या हद्दीत एक इसम देशी पिस्तुल बाळगून फिरत असल्याची गोपनीय माहिती पथकाला मिळाली होती. या माहितीची गंभीर दखल घेत पोलीस निरीक्षक रामकृष्ण जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली तात्काळ सापळा रचण्यात आला.

या कारवाईत पोलीस उपनिरीक्षक गणेश सपकाळ, परी. पो. उपनिरीक्षक दिपक घोगरे, पोलीस हवालदार रावसाहेब शेंडे, किरण पडघण, पोलीस शिपाई गौरव ठाकरे, पवन नांदेकर, पवन तडसे व मयुर तेल्लेवार यांच्या पथकाने संशयित इसमाला घेराव घालून ताब्यात घेतले. तपासादरम्यान आरोपीने आपले नाव सुजीत रावसाहेब कदम (वय ४६, रा. शुभम अपार्टमेंट, संकट मोचन रोड, माईंदे चौक, हं.मु. समर्थवाडी, यवतमाळ) असे सांगितले. त्याची झडती घेतली असता कमरेला एक देशी बनावटीची पिस्तुल व दोन जिवंत काडतुसे आढळून आली. तसेच त्याच्याकडील TVS Jupiter (क्र. MH 29 CK 5640) या दुचाकीच्या डिक्कीतून आणखी एक देशी पिस्तुल व दोन जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली. अशा प्रकारे एकूण दोन पिस्तुल व चार जिवंत काडतुस पोलिसांनी हस्तगत केली.

जप्त मुद्देमालामध्ये दोन देशी बनावटीच्या स्टील पिस्तुलांची किंमत प्रत्येकी अंदाजे ४०,००० रुपये, चार जिवंत काडतुसांची किंमत अंदाजे १०,००० रुपये तर दुचाकी वाहनाची किंमत १,००,००० रुपये अशी मिळून एकूण २,००,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी आरोपीविरुद्ध भारतीय हत्यार कायदा कलम ३/२५ तसेच महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १३५ अंतर्गत गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक, अपर पोलीस अधीक्षक, उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

# वादळी वाऱ्यासह पावसाने घरांसह पिकांचे नुकसान

प्रतिनिधी ८ मे





**आर्णी** : तालुक्यात बुधवारी सायंकाळी झालेल्या तुफान वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाने ग्रामीण भागाला जोरदार तडाखा दिला. साकुर, मुकिंदपूर, अंबोडा, कवठाबाजार, कोसदनी तसेच लोणबेहळ परिसरातील अनेक गावांमध्ये घरांचे, शेतीपिकांचे आणि मालमत्तेचे मोठे नुकसान झाले.

साकुर गावात अनेक घरांवरील टिनपत्रे उडून गेल्याने घरातील धान्य भिजले. दत्तात्रय भालेराव यांच्या शौचालय व बाथरूमवर लिंबाचे मोठे झाड कोसळल्याने ते जमीनदोस्त झाले. तसेच झोपडपट्टी परिसरातील रामदास खाडे यांच्या घरावर झाड कोसळल्याने घराचे मोठे नुकसान झाले. वादळी वाऱ्यामुळे अनेकांच्या घरांवरील पत्रे उडून गेली असून घरातील धान्य पूर्णतः ओले झाले आहे. लोणबेहळ परिसरातील शेतकऱ्यांच्या शेतातील तीळ, ज्वारी, बाजरी, भाजीपाला तसेच फळपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. अनेक शेतांमध्ये पिके आडवी झाली असून जनावरांनाही फटका बसला आहे. काही ठिकाणी गाई, म्हशी व शेळ्या जखमी झाल्याची माहिती आहे. या नैसर्गिक आपत्तीत सुदैवाने जीवितहानी झाली नसली, तरी स्थावर मालमत्तेचे मोठे नुकसान झाले आहे.

अवकाळी पाऊस व वादळी वाऱ्यामुळे झालेल्या नुकसानीची तातडीने पाहणी करून नुकसानग्रस्तांना आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी परिसरातील नागरिक व शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे.

# एसटी आरक्षण अभ्यास समितीच्या कामाचा अहवाल जाहीर करा; गोर सेनेची मागणी

प्रतिनिधी ८ मे




**उमरखेड** : गोरबंजारा समाजाला अनुसूचित जमाती (एसटी) प्रवर्गातून आरक्षण देण्याच्या मागणीसाठी स्थापन करण्यात आलेल्या अभ्यास समितीने गेल्या पाच महिन्यांत नेमके कोणते काम केले, याचा अहवाल समाजासमोर मांडावा, अशी मागणी गोर सेनेच्या वतीने करण्यात आली आहे. या मागणीसाठी राज्यभरातील ३०० हून अधिक ठिकाणी निवेदने देण्यात आली.

गोर सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. संदेश चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली उपविभागीय अधिकारी, तहसीलदार आणि जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर करण्यात आले.

गेल्या वर्षी गोरबंजारा समाजाला एसटी प्रवर्गातून आरक्षण द्यावे, हैदराबाद गॅझेट लागू करावे आदी मागण्यांसाठी राज्यभरात ५५ महामोर्चे काढण्यात आले होते. तसेच समृद्धी महामार्गावर रास्ता रोको आंदोलनही करण्यात आले होते. त्यानंतर ४ नोव्हेंबर रोजी मुंबई येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि बंजारा समाजाच्या शिष्टमंडळात चर्चा झाली होती.

या बैठकीनंतर उच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश तहलियानी यांच्या अध्यक्षतेखाली एसटी आरक्षणासंदर्भात अभ्यास समिती नेमण्यात आली. मात्र समितीने गेल्या पाच महिन्यांत कोणत्या दिशेने अभ्यास केला, कोणती माहिती संकलित केली किंवा पुढील प्रक्रिया काय आहे, याबाबत समाजाला कोणतीही माहिती देण्यात आलेली नाही, असा आरोप गोर सेनेने केला आहे.

गोरबंजारा समाजाची स्वतंत्र गोरधाटी संस्कृती, गोरबोली भाषा, पारंपरिक तांडा पद्धतीचे वास्तव, वेगळा पेहराव, आर्थिक मागासलेपण आणि आदिम जीवनशैली यामुळे समाजाला एसटी प्रवर्गाचा समांतर आरक्षणाचा लाभ द्यावा, ही मागणी गेल्या ७५ वर्षांपासून प्रलंबित असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

या मागणीसाठी राज्यभर आंदोलन, आमरण उपोषणे, रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. काही युवकांनी आत्मबलिदानही दिल्याचा उल्लेख निवेदनात करण्यात आला आहे.

अभ्यास समितीने आतापर्यंत केलेल्या कामाचा तपशील जाहीर करून समाजातील संभ्रम दूर करावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली. निवेदन देताना गोर सेनेचे जिल्हाध्यक्ष, जिल्हासचिव, तालुकाध्यक्ष, तालुका सचिव तसेच पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# खरीप हंगामात शेतकऱ्यांना खत, बी-बियाणे पुरवठ्याचे सूक्ष्म नियोजन करा!

## पालकमंत्री ना. संजय राठोड यांचे निर्देश : जिल्ह्यात ६ लाख १६ हजार हेक्टरवर खरीपाचे नियोजन > पीक विमासंदर्भात मुख्यमंत्री व कृषिमंत्र्यांकडे होणार बैठक

प्रतिनिधी ८ मे



**यवतमाळ** : जिल्ह्यात खरीप हंगामाची लगबग सुरु झाली असून शेतकऱ्यांना खत, बी-बियाणे, औषधी पुरवठ्यात अडचणी येणार नाहीत यासाठी जिल्हा प्रशासन व कृषी विभागाने सूक्ष्म नियोजन करावे, निर्देश पालकमंत्री ना. संजय राठोड यांनी आज दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन सभागृहात पालकमंत्री ना. राठोड यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय खरीप हंगामपूर्व नियोजन आढावा बैठक झाली.

त्यावेळी ते बोलत होते. या बैठकीला खा. प्रतिभा धानोरकर, आ. बाळासाहेब मांगुळकर, आ. राजू तोडसाम, आ. किसन वानखेडे, आ. संजय देरकर, जिल्हाधिकारी विकास मीना, मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी मनोजकुमार ढगे, कृषी विज्ञान केंद्राचे कच्छवे व विविध विभागाचे प्रमुख, सर्व तालुका कृषी अधिकारी उपस्थित होते.

पालकमंत्रीना. संजय राठोड पुढे म्हणाले, खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना लवकरात लवकर पीक कर्जाचे वाटप पूर्ण करावे. शेतकऱ्यांना दर्जेदार खत, बी-बियाणे, औषधी उपलब्धतेसाठी नियोजन करावे. जिल्ह्यात खत, बी-बियाण्यांचा तुटवडा जाणवणार नाही याची काळजी घ्यावी. तसेच खत, बी-बियाण्यांचा काळाबाजार करणाऱ्यांवर धडक कारवाई करावी. शेतकऱ्यांच्या मदतीसाठी टोल फ्री क्रमांक कार्यान्वित ठेवावा. फळबाग व भाजीपाला लागवडीचे उद्दिष्ट पूर्ण करावे. पशुधनासाठी वैरण विकासाचा धडक कार्यक्रम राबवावा. वीज पुरवठा खंडीत होणार नाही याची दक्षता घ्यावी.

मुख्यमंत्री मत्स्यसंपदा योजनेचा प्रचार प्रसार करावा, शेतकऱ्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ द्यावा, असे निर्देश पालकमंत्री ना. राठोड यांनी यावेळी दिले.

### भरारी पथक व नियंत्रण कक्ष

■ यंदाच्या खरीप हंगामासाठी कृषी विभागाने जिल्ह्यात गुणनियंत्रण भरारी पथके, नियंत्रण कक्ष व समित्या नेमल्या आहेत. यात ३६ गुणनियंत्रण निरीक्षक, जिल्हास्तरावर एक भरारी पथक, तालुका व पंचायत समितीस्तरावर ३२ नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आले आहेत. तसेच कापूस तक्रार निवारण समिती, कृषी निविष्ठा सनियंत्रण समिती, जैवतंत्रज्ञाण समिती स्थापन करण्यात आली असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

### फळबाग लागवडीसाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहित करा

■ शेतीपूरक व्यवसायांना चालना देण्यासाठी जिल्ह्यात फळबाग लागवडीविषयी शेतकऱ्यांना प्रोत्साहित करावे. जिल्ह्यातील फळबाग लागवडीचे क्षेत्र वाढवावे. त्यासाठी शेतकऱ्यांना फळबाग लागवड योजनेचा लाभ द्यावा. फळवाग लागवडीसाठी रोपे तयार ठेवावेत, असे निर्देश पालकमंत्र्यांनी यावेळी दिले.

### जलयुक्त शिवार योजनेतील कामे पूर्ण करा

■ जलयुक्त शिवार योजना २.० अंतर्गत जिल्ह्यात १४३१ कामे मंजूर आहेत. ही कामे जूनपर्यंत पूर्ण करावीत. तसेच जलतारा प्रकल्पांतर्गत शेत शोषखड्डयांचे काम लवकरात लवकर सुरु करावेत, असे निर्देश पालकमंत्री ना. राठोड यांनी यावेळी दिले.

# आधुनिक क्रीडा सुविधांमुळे जिल्ह्यातून घडणार आंतरराष्ट्रीय खेळाडू - पालकमंत्री ना. संजय राठोड

## यवतमाळात साकारणार विदर्भातील पहिले आंतरराष्ट्रीय दर्जाचे 'अॅस्ट्रोटर्फ' हॉकी मैदान !

प्रतिनिधी ८ मे



**यवतमाळ** : महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा विकास धोरणांतर्गत यवतमाळ जिल्ह्यातील क्रीडा सुविधांना आधुनिक व आंतरराष्ट्रीय दर्जा देण्याच्या दृष्टीने जिल्हा क्रीडा संकुल येथे विविध पायाभुत सुविधांची उभारणी करण्यात आली. पंचायत समिती समोरील प्रस्तावित आंतरराष्ट्रीय दर्जाच्या 'अॅस्ट्रोटर्फ' हॉकी मैदानाचे भूमिपूजन आणि नेहरू स्टेडियम येथील नव्याने उभारण्यात आलेल्या सिंथेटीक हँडबॉल मैदानाचे लोकार्पण गुरुवारी (दि. 7 मे) पालकमंत्री ना. संजय राठोड यांच्या हस्ते करण्यात आले.

या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड होते. प्रमुख अतिथी म्हणून विधानसभा सदस्य किसन वानखेडे, नगराध्यक्षा अॅड. प्रियदर्शनी उईके उपस्थित होत्या. तसेच जिल्हाधिकारी विकास मीना, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता विक्रांत शिरभाते आणि आंतरराष्ट्रीय हॉकीपटू आकाश चिकटे यांची विशेष उपस्थिती होती. कार्यक्रमात बोलताना पालकमंत्री ना.संजय राठोड म्हणाले की, जिल्हा किंवा तालुका स्तरावर खेळाडूंना कोणत्याही क्रीडा सुविधांची किंवा मैदानांची आवश्यकता असल्यास त्यांनी थेट माझ्याशी किंवा जिल्हाधिकाऱ्यांशी संपर्क साधावा. तसेच यवतमाळ शहरातही दारव्हा येथील क्रीडा संकुलाच्या धर्तीवर अत्याधुनिक सुविधांनी युक्त संकुल उभारण्याच्या सूचना त्यांनी नगराध्यक्षांना दिल्या. उत्कृष्ट क्रीडांगण निर्मितीसाठी पुढाकार घेतल्याबद्दल त्यांनी जिल्हा प्रशासन, जिल्हा परिषद आणि क्रीडा विभागाचे अभिनंदन केले.

अॅस्ट्रोटर्फ हॉकी मैदान आणि सिंथेटीक हँडबॉल मैदानामुळे स्थानिक खेळाडूंना आंतरराष्ट्रीय दर्जाच्या मैदानावर सराव करण्याची संधी मिळणार आहे. यामुळे भविष्यात यवतमाळ जिल्ह्यातून जागतिक स्तरावरील खेळाडू घडण्यास मोठी मदत होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. जिल्हा क्रीडा अधिकारी शिल्पा चाबुकस्वार यांच्या मार्गदर्शनाखाली हा सोहळा यशस्वी झाला. कार्यक्रमाला विविध क्रीडा संघटनांचे पदाधिकारी, प्रशिक्षक, वरिष्ठ अधिकारी आणि मोठ्या संख्येने खेळाडू व क्रीडाप्रेमी नागरिक उपस्थित होते.

# विजांचा तडाखा; युवकाचा मृत्यू, मायलेक जखमी

प्रतिनिधी ८ मे

■ नंदाबाई आडे यांच्या शेतात ज्वारी काढणीसाठी श्रीनिवास राठोड हे स्वतःचे हॉलर घेऊन गेले होते. दुपारी अडीचच्या सुमारास अचानक हवामानात बदल होऊन विजांच्या कडकडाटासह पावसाला सुरुवात झाली. त्यावेळी श्रीनिवास राठोड हे आंब्याच्या झाडाखाली आश्रयासाठी गेले. त्यांच्या मागोमाग नंदाबाई आडे व यश आडे हेही तेथे जात असतानाच झाडाजवळ वीज कोसळली.

**उमरखेड** : तालुक्यातील दराटी-कोरटा मार्गावरील शिवाजीनगर शिवारात काल दुपारी वीज कोसळून एका युवकाचा मृत्यू झाला, तर शेतमालक महिला व तिचा मुलगा गंभीर जखमी झाले. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

श्रीनिवास देविदास राठोड (वय ३२) असे मृत युवकाचे नाव आहे. तर नंदाबाई जीवन आडे (वय ३८) आणि त्यांचा मुलगा यश जीवन आडे (वय १७) हे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर किनवट येथील उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

या दुर्घटनेत श्रीनिवास राठोड यांचा जागीच मृत्यू झाला, तर नंदाबाई आडे व यश आडे यांच्या हातापायांना गंभीर भाजल्या गेल्या. जखमींना तातडीने किनवट येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. घटनेची माहिती मिळताच तहसीलदार आर. यू. सुरडकर यांनी तलाठी सुनील वानखेडे यांना घटनास्थळी पाठवून पंचनामा करण्याचे निर्देश दिले.

**उमरखेड शिवारात म्हैस दगावली** : दरम्यान, उमरखेड खंड क्रमांक १ परिसरातही वीज कोसळून एका म्हशीचा मृत्यू झाला. हिरामण भुजंगा दुधेवार यांच्या सर्व्हे क्रमांक १३३/३ मधील शेतातील पाच वर्षीय म्हैस वीज कोसळल्याने जागीच दगावली. त्यामुळे त्यांचे आर्थिक नुकसान झाले आहे.

अवकाळी पाऊस आणि विजांच्या वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी हवामानाचा अंदाज घेऊनच शेतातील कामे करावीत तसेच वातावरणात अचानक बदल झाल्यास झाडांचा आश्रय घेऊ नये, असे आवाहन तहसीलदार आर. यू. सुरडकर यांनी केले आहे.

सिटी न्यूज अमरावती
शुक्रवार, दि. ८ मे २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# विद्यापीठात पद्मश्री डॉ. शिवाजीराव उपाख्य दाजीसाहेब पटवर्धन यांची पुण्यतिथी

**अमरावती:** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात पद्मश्री डॉ. शिवाजीराव उपाख्य दाजीसाहेब पटवर्धन यांची पुण्यतिथी डॉ. शिवाजीराव उपाख्य दाजीसाहेब पटवर्धन वसतीगृह येथे संपन्न झाली. कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी डॉ. शिवाजीराव उपाख्य दाजीसाहेब



पटवर्धन यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण करुन विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, वसतीगृहातील श्री चंद्रशेखर लोखंडे तसेच विद्यापीठातील कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# अमरावतीमध्ये हिंदुत्व जागृतीसंदर्भात महत्वाची बैठक उत्साहात

प्रतिनिधी ८ मे




**अमरावती:** मुंबई आणि गोवा येथील हिंदू जनजागृती संस्था आणि सनातन संस्थेचे प्रमुख सुनील जी. गणवट यांनी अमरावती दौऱ्यादरम्यान प्रसिद्ध समाजसेवक चंद्रकुमार जाजोदिया यांच्या निवासस्थानी विशेष भेट दिली.

याप्रसंगी हिंदुत्व, सनातन संस्कृती, राष्ट्रीय जागृती आणि समाजात धार्मिक जाणीव वाढवणे यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर सविस्तर चर्चा झाली. या बैठकीत हिंदू समाजाला संघटित करण्यावर आणि तरुणांमध्ये मूल्ये व देशभक्ती रुजवण्यावर विशेष भर देण्यात आला. चर्चेदरम्यान, अमरावतीमध्ये हिंदू जनजागृती संस्थेचा एक मोठा मेळावा आयोजित करण्यासंदर्भात विशेष चर्चा झाली. या प्रस्तावित मेळाव्याबाबत हिंदू समाजात उत्साहाचे वातावरण असून, हजारो हिंदूंनी उपस्थित राहण्याची प्रतिज्ञा केली आहे. चंद्रकुमार जाजोदिया यांनी सांगितले की, हिंदुत्व आणि सनातन धर्माबद्दल जागरूकता निर्माण करणे ही काळाची गरज आहे आणि असे कार्यक्रम समाजाला एक नवी दिशा देतील.

याप्रसंगी इस्कॉनचे मधुपतिदास महाराज, भाजप युवा मोर्चाचे शहर अध्यक्ष विकी शर्मा, करण धोते, आशिष सुतवाल, आशिष अग्रवाल, अनिकेत जोशी, क्षितिज धुंधी, प्रथमेश अधौ, रोशन गुप्ता आणि अनेक हिंदुत्ववादी कार्यकर्ते व समाजसेवक उपस्थित होते.

# शिवसैनिकांसह आजी-माजी पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत माजी खासदार अनंतराव गुढे यांची घोषणा

## ♦ शिवसेना प्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे यांचे जन्मशताब्दी वर्ष साजरे करणार

प्रतिनिधी ८ मे



**अमरावती :** भूतकाळातील शिवसेनेचे वैभव पाहता अमरावती जिल्ह्यामध्ये अनंतराव गुढे यांचेसह एक खासदार, तीन आमदार, जिल्हा परिषद उपाध्यक्ष, मनपा उपमहापौर, जि. प. सदस्य, पंचायत समिती सभापती, सरपंच होते. एके काळी काँग्रेसचे केंद्र आणि राज्यात सरकारे असताना सुद्धा शिवसेनेने प्रचंड यश मिळवित राज्यात प्रथमच शिवसेना-भाजपा युतीचे सरकार स्थापन करून पहिला गैरकाँग्रेसी मुख्यमंत्री हिंदूहृदयसम्राट स्व. बाळासाहेबांनी बसविला, पण आज हे वैभव अमरावती जिल्ह्यात आज नाहीसे झाल्याची खंत अनंतराव गुढे यांना सतत सलत होती. शिवसेनेचे जुने वैभव जिल्ह्यात पुन्हा यावे या उद्देशाने व शिवसेना प्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षाचे औचित्य साधून माजी, आजी पदाधिकारी व निष्ठावंत शिवसैनिकाची बैठक स्थानिक शासकीय विश्रामगृह येथे दि. ६ मे रोजी आयोजित केली होती. अनंतराव गुढे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या सभेत अनेक मान्यवरांची भाषणे झाली. या प्रसंगी शिवसैनिकांना मार्गदर्शन करतांना संघटन मजबूत करून पुन्हा शिवसेनेला गत वैभव प्राप्त झाले पाहिजे. प्रत्येकाने संघटने करीता झटून पुन्हा शिवसेनेचा डोलारा ऊभा कसा करता येईल यावर मंथन व चिंतन करण्यात आले. आपल्या अध्यक्षीय भाषणामध्ये अनंतराव गुढे यांनी पक्ष वाढविण्यास भर देऊन शिवसैनिकांमध्ये नवचैतन्य निर्माण केले. हिंदूहृदयसम्राट मा. बाळासाहेबांचे विचार आणि मराठी अस्मितेचा वारसा या जन्मशताब्दीच्या कालावधीत विशेषतः स्मरणात ठेवला जात आहे. बाळासाहेब ठाकरे जन्मशताब्दी सुरुवात २३ जानेवारी २०२६ रोजी बाळासाहेबांच्या १०० व्या जयंतीपासून त्यांच्या जन्मशताब्दी वर्षाची अधिकृत सुरुवात झाली जे सन २०२७ पर्यंत साजरे केले जाणार आहे.

# उन्हाळी परीक्षेच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठाचा पुढाकार

## ♦ पाचही जिल्ह्यात 'उष्माघात मदत कक्ष' स्थापन

प्रतिनिधी ८ मे



**अमरावती:** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या उन्हाळी परीक्षा सध्या सुरू आहेत. वाढत्या तापमानामुळे विद्यार्थ्यांना परीक्षेदरम्यान उष्माघात आणि निर्जलीकरण यांसारख्या समस्यांचा सामना करावा लागू शकतो. ही बाब लक्षात घेऊन कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठ विद्यार्थी विकास विभागातर्फे विद्यापीठ परिक्षेत्रातील पाचही जिल्ह्यांमध्ये 'जिल्हास्तरीय उष्माघात मदत कक्ष' स्थापन करण्यात आले आहेत. या उपक्रमाच्या नियोजनासाठी गुरुवारी, ७ मे रोजी विद्यार्थी विकास विभागात एका विशेष सभेचे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी सभेच्या अध्यक्षस्थानी विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर होते. यावेळी उष्माघात जिल्हा समितीचे मार्गदर्शक प्राचार्य डॉ. अतुल बोडखे, तसेच समितीचे सदस्य डॉ. सावन देशमुख, डॉ. हरिदास आखरे, डॉ. नितीन सराफ, डॉ. राहुल सावरकर, डॉ. शीतल तायडे, प्राचार्य जी. एन. चौधरी आणि रोहन बुंदेले उपस्थित होते. डॉ. राजीव बोरकर यांनी उष्माघात या संकल्पनेची पार्श्वभूमी आणि त्याचे गांभीर्य विषद केले. तर डॉ. सावन देशमुख व प्राचार्य अतुल बोडखे यांनी उष्माघातापासून बचाव करण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांबाबत उपस्थितांना सविस्तर मार्गदर्शन केले.

**विद्यार्थ्यांसाठी आरोग्य साहित्याचे वाटप**

या अभिनव उपक्रमांतर्गत संत गाडगे बाबा प्रतिष्ठानतर्फे परीक्षार्थी विद्यार्थ्यांसाठी ओआरएस पाकिटे, ग्लुकोज पावडर व इतर प्रथमोपचार साहित्याचे मान्यवरांच्या हस्ते वितरण करण्यात आले. दर्यापूर येथील जे. डी. पाटील सांगळुदकर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. के. बोडखे आणि अमरावती ग्रामीण विभागातील विविध महाविद्यालयांचे प्राचार्य व प्राध्यापक या प्रसंगी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अमरावती महानगरपालिकेची प्रतिबंधात्मक प्लास्टिकविरोधात धडक कारवाई

## ♦ ११४० किलो प्लास्टिक साहित्य जप्त; व्यापाऱ्यावर १० हजारांचा दंड

प्रतिनिधी ८ मे



**अमरावती:** अमरावती महानगरपालिकेने प्रतिबंधात्मक प्लास्टिकविरोधात आज मोठी कारवाई करत तब्बल ११४० किलो प्लास्टिक साहित्य जप्त केले. ‰स्वच्छ शहर – प्लास्टिकमुक्त शहर‰ या उद्दिष्टाने महानगरपालिका प्रशासनाने विशेष मोहीम राबवत संबंधित व्यापाऱ्यावर १० हजारांचा दंडही वसूल केला.

महानगरपालिका आयुक्त वर्षा लड्डा व अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांच्या आदेशानुसार तसेच वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ. अजय जाधव आणि सहाय्यक आयुक्त मनोज शहाळे (झोन क्र. ५) यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. इतवारा बाजार पेट्रोल पंप परिसरातील अजय बजाज यांच्या दयाल ट्रेडर्स येथे मोठ्या प्रमाणात प्रतिबंधात्मक प्लास्टिक विक्री सुरू असल्याची माहिती महानगरपालिकेला मिळाली होती. त्यानंतर प्लास्टिक विभाग आणि अतिक्रमण विभागाच्या संयुक्त पथकाने तात्काळ दुकानावर धडक कारवाई केली.

तपासणीदरम्यान संबंधित व्यापाऱ्याचे आणखी एक गोडाऊन एसबीआय बँक (श्याम चौक) मागे असल्याचे समोर आले. त्यानंतर पथकाने त्या ठिकाणीही छापा टाकून कठोर कारवाई केली.

या मोहिमेत प्लास्टिक पन्नी, प्लास्टिक ग्लास, पन्नी कोटिंग असलेल्या पत्रावळ्या आदी प्रतिबंधात्मक साहित्य जप्त करण्यात आले. जप्त करण्यात आलेल्या साहित्याची अंदाजे किंमत १.७५ ते २ लाख असल्याचे सांगण्यात आले.

विशेष म्हणजे, दयाल ट्रेडर्स येथे दुसऱ्यांदा प्रतिबंधात्मक प्लास्टिकचा साठा आढळून आल्याने संबंधित व्यापाऱ्याकडून १०,०००/- दंड धनादेशाद्वारे वसूल करण्यात आला.

या कारवाईत प्लास्टिक नोडल अधिकारी ए. के. गोहर, प्लास्टिक स्वास्थ्य निरीक्षक सचिन सैनी तसेच अतिक्रमण विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

महानगरपालिकेने स्पष्ट केले की, 'स्वच्छ शहर – प्लास्टिकमुक्त शहर' ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी प्रतिबंधात्मक प्लास्टिकविरोधातील मोहिमा पुढील काळात आणखी तीव्र करण्यात येणार आहेत.

# भाजप शहर अध्यक्ष डॉ. नितीन धांडे यांचा ११ मे रोजी अभिष्टचिंतन सोहळा

## ♦ पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार कार्यक्रम ♦ विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन

प्रतिनिधी ८ मे



**अमरावती:** भाजपचे अमरावती शहर व जिल्हा अध्यक्ष, विदर्भ युथ वेल्फेअर सोसायटीचे अध्यक्ष तसेच जिल्हा नियोजन समितीचे सदस्य डॉ. नितीन धांडे यांच्या वाढदिवसानिमित्त ११ मे रोजी भव्य अभिष्टचिंतन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या निमित्ताने शहरात विविध सामाजिक उपक्रमांचेही आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे.

डॉ. धांडे यांनी राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रात दिलेल्या योगदानाबद्दल तसेच अमरावती जिल्ह्याच्या विकासासाठी केलेल्या कार्याची दखल घेत त्यांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

अमरावती शहरातील संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन येथे सोमवार, ११ मे रोजी सायंकाळी ६ वाजता हा कार्यक्रम पार पडणार असून, राज्याचे महसूल मंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे हे प्रमुख उपस्थित राहणार आहेत.

या प्रसंगी भाजपचे प्रदेश महामंत्री तथा अमरावती प्रभारी आ. संजय कुटे, राज्यसभा खासदार डॉ. अनिल बोंडे, माजी खासदार नवनीत राणा, भाजपचे मुख्य प्रतोद आ. रणधीर सावरकर, संघटन मंत्री डॉ. उपेंद्र कोठेकर, महापौर श्रीचंद तेजवानी, माजी राज्यमंत्री आ. परिणय फुके, आ. प्रताप अडसड, आ. रवी राणा, आ. प्रवीण तायडे, आ. उमेश यावलकर, आ. राजेश वानखडे, आ. केवलराम काळे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. याशिवाय आ. सुलभाताई खोडके, आ. संजय खोडके, राष्ट्रीय ओबीसी आयोगाच्या सदस्या किरणताई महल्ले, आ. गजानन लवटे, माजी खासदार रामदास तडस, माजी आमदार प्रवीण पोटे, माजी पालकमंत्री जगदीश गुप्ता, सुनील देशमुख, भाजप जिल्हाध्यक्ष प्रभुदास भिलावेकर, रविराज देशमुख, उपमहापौर सचिन भेंडे, स्थायी समिती सभापती अविनाश मार्डीकर, सभागृह नेता चेतन गावंडे, विरोधी पक्षनेते विलास इंगोले, तसेच विविध पक्षांचे व सामाजिक क्षेत्रातील पदाधिकारी उपस्थित राहणार असल्याचे सांगण्यात आले. डॉक्टर नितीन धांडे यांच्या वाढदिवसानिमित्त ११ मे रोजी सकाळी विदर्भाची कुलस्वामिनी श्री अंबादेवी व एकवीरा देवी मंदिरात महाआरती करण्यात येणार असून त्यानंतर स्थानिक गोरक्षण येथे लापशी तुला करण्यात येणार आहे. यासोबतच शहराच्या विविध भागात विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन देखील करण्यात आले आहे अशी माहिती आयोजन समितीने दिली. अभिष्टचिंतन सोहळ्याला भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच अमरावतीकरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# अर्जुन नगरवासीयांनी वाचला समस्यांचा पाढा

## ♦ घाणीचे साम्राज्य आणि नियोजनशून्य कारभाराविरोधात खासदार व लोकप्रतिनिधींकडे गाऱ्हाणे

प्रतिनिधी ८ मे



**अमरावती:** अर्जुन नगर आणि परिसरातील गंभीर नागरी समस्यांबाबत आज परिसरातील शेकडो नागरिकांनी खासदार बळवंतभाऊ वानखडे, माजी मंत्री ॲड. यशोमतीताई ठाकूर, मनपाचे विरोधी पक्ष नेते विलासभाऊ इंगोले आणि बबलूभाऊ शेखावत यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. यावेळी नागरिकांनी केवळ रस्ते आणि पायाभूत सुविधाच नव्हे, तर परिसरात पसरलेल्या घाणीच्या साम्राज्याबद्दलही तीव्र संताप व्यक्त केला.

अर्जुन नगर परिसरात सध्या घाणीचे प्रचंड साम्राज्य पसरले असून नियमितपणे कचरा उचलला जात नाही. घंटागाड्या वेळेवर येत नसल्याने जागोजागी कचऱ्याचे ढीग साचले आहेत, ज्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. प्रशासनाने तातडीने स्वच्छतेकडे लक्ष द्यावे, अशी आग्रही मागणी करण्यात आली.

जवळपास १५,००० नागरिकांच्या रहदारीसाठी केवळ २० फुटांचा रस्ता शिल्लक ठेवण्यात आला आहे. नवीन ले-आउट्सना मंजुरी देताना जुन्या वहिवाटीचे रस्ते नकाशातून गायब करण्यात आल्याचा आरोप रहिवाशांनी केला. 'सृष्टी रॉयल पार्क' सारख्या प्रकल्पांच्या नकाशांची पुनर्तपासणी करून दोषी अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. अमरावती-नागपूर महामार्गावर अर्जुन नगर स्टॉप ते शिंगोरे लॉन रोड दरम्यान परशुराम कॉलनी, मेडिकल कॉलनीसाठी योग्य ठिकाणी 'कट' नसल्याने अपघात वाढत आहेत. नागरिकांच्या सोयीसाठी येथे तातडीने चौक निर्माण करावा.

परिसराच्या सौंदर्यीकरणासाठी भव्य 'प्रवेशद्वार' उभारणे आणि सुरक्षेच्या दृष्टीने परिसरात ५ हाय-मास्ट दिवे लावण्याची विनंती खासदार निधीतून करण्यात आली.

यावेळी आपल्या भागातील समस्या मांडण्यासाठी राहुल इंगळे, प्रमोद खंडारे, पंजाबराव मात्रे, दिलीपराव केणे, प्रेमराजजी बनारसे, विशाल पाचघरे, आशिष खोजे, विवेक नाकाडे, विरेंद्र भट, स्वप्नील देशमुख, नवनीत पाचघरे, निखिल रामटेके, अतिन देशमुख, विशाल पवार, अंकुश काळे, प्रशांत कोराट, प्रतिक देशमुख, अभिजीत महल्ले, शुभम पतिंगे, महेश राऊत, बाबुराव राऊत, श्रीकांत देशमुख, नीरज निस्ताने, दिपक कोहळे, विवेक अलोलकर , विजय तराळ, सचिन निस्ताने, प्रविण गावंडे, यांच्यासह परिसरातील अनेक रहिवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आ. रवि राणा यांच्या अथक प्रयत्नाने मंजुर मुख्यमंत्री बळीराजा पांदण रस्त्याचे उद्घाटन

प्रतिनिधी ८ मे



**अमरावती :** मलकापुर गॅस पंपा पासुन ते कवठा बहाळे डांबरीकरण रस्त्या पर्यत पांदण रस्ता व पिप्रि ते चांदुरी शिव, तसेच मलकापुर ते वनारसी पांदण रस्त्याचे भ्एझ् चे मार्गदर्शन सुनिल राणा यांच्या हस्ते ९० लक्ष रुपयांच्या भुमीपुजन करण्यात आले.

ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना शेतीमाल वाहतुकीसाठी चांगले रस्ते उपलब्ध व्हावेत, पावसाळ्यात होणारी गैरसोय दूर व्हावी आणि गावांच्या विकासाला गती मिळावी यासाठी आ.रवि राणा सातत्याने प्रयत्नशील – सुनिल राणा म्हणाले.

यावेळी अमरावती तहसिलदार .विजय लोखंडे, भातकुली तालुका मा.अध्यक्ष मंगेश इंगोले, जिल्हा नियोजन समिती सदस्य आशिष कावरे, सरपंच जयश्री सयाम, उपसरपंच श्री.प्रतीक अब्रुक, सरपंच वनमाला कोडापे, संजय मोहोड, प्रविण चौखट यांची उपस्थिती

अमरावती - आ.रवि राणा यांच्या अथक प्रयत्नाने मंजूर झालेल्या मुख्यमंत्री बळीराजा पांदण रस्त्याच्या महाराष्ट्रातील पहिल्या भूमिपूजन सोहळ्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. मलकापुर गॅस पंपा पासुन ते कवठा बहाळे डांबरीकरण रस्त्या पर्यत पांदण रस्ता व पिप्रि ते चांदुरी शिव, मलकापुर ते वनारसी पांदण रस्त्याचे युवा स्वाभिमान पार्टीचे मार्गदर्शक सुनिल राणा यांच्या हस्ते ९० लक्ष रुपयांचे उद्घाटन संपन्न झाले. या ऐतिहासिक भूमिपूजनामुळे परिसरातील शेतकरी व नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या प्रसंगी बोलताना सुनिल राणा यांनी सांगितले की, ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना शेतीमाल वाहतुकीसाठी चांगले रस्ते उपलब्ध व्हावेत, पावसाळ्यात होणारी गैरसोय दूर व्हावी आणि गावांच्या विकासाला गती मिळावी यासाठी आ.रवि राणा सातत्याने प्रयत्नशील आहेत. मुख्यमंत्री बळीराजा पांदण रस्ता योजना ही शेतकऱ्यांच्या हिताची योजना असून या माध्यमातून ग्रामीण भागातील अनेक रस्त्यांचे चित्र बदलणार असल्याचे त्यांनी सांगितले.

मलकापूर ते कवठा बहाळे हा मार्ग अनेक वर्षांपासून दुरवस्थेत होता. या रस्त्यामुळे शेतकऱ्यांना शेतीमाल बाजारात नेण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांना व नागरिकांना ये-जा करण्यासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. आता हा रस्ता पांधण रस्ता तयार होणार असल्याने परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले. भूमिपूजन कार्यक्रमाला अमरावती तहसिलदार श्री.विजय लोखंडे, भातकुली तालुका माजी अध्यक्ष मंगेश इंगोले, जिल्हा नियोजन समिती सदस्य आशिष कावरे, सरपंच जयश्री सयाम, उपसरपंच प्रतीक अब्रुक, सरपंच वनमाला कोडापे, संजय मोहोड, प्रविण चौखट यांच्यासह डॉ.बाळापुरे, देवा शेंडे, समाधान वानखडे, अर्जुन दाते, गौतम खंडारे, राजु हरणे, बाबु पाटील, सुधिर गुल्हाने, रवि घुगडे, संजय वानखडे, संजय शिरभाते, ज्ञानेशवर काळबांडे, विक्की ठाकुर, सागर टोळे यांच्यासह ग्रामस्थ, शेतकरी व युवा स्वाभिमान पार्टीचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अमरावतीत २,५,व १० रुपये मुद्रांक तिकीटाचा तुटवडा

## ♦ राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हा कोषागार अधिकाऱ्यांना निवेदन

प्रतिनिधी ८ मे



**अमरावती:** सध्या अमरावती शहर व जिल्ह्यामध्ये २, ५, व १० रुपयांचे मुद्रांक तिकीटे तत्काळ उपलब्ध करून देण्याच्या मागणीला घेऊन राष्ट्रवादी युवक काँग्रेस अमरावती शहरच्या वतीने जिल्हा कोषागार अधिकारी कार्यालय येथे निवेदन देण्यात आले. निवेदनात सांगण्यात आले कि, सद्या अमरावती शहर व जिल्ह्यामध्ये २, ५, व १० रुपयांचे मुद्रांक तिकीटांचा मोठा तुटवडा जाणवत आहे. शहरात शालेय व महाविद्यालयीन कामकाजासाठी लागणारे दाखले , तसेच महसूल संदर्भातील कामांकरिता , न्यायालयीन कामे आदींकरिता २, ५, व १० रुपयांचे मुद्रांक तिकिटांची नेहमीच आवश्यकता असते. बऱ्याच ठिकाणी मुद्रांक शुल्क तिकीट स्वरूपात पाच रुपये व दहा रुपये आकारल्या जात असून या तिकिटांची सुद्धा उपलब्धता नसल्यामुळे वीस रुपये पेक्षा जास्त किमतीचे तिकिटे उपलब्ध केली जात आहेत. ज्यामुळे नागरिकांना नाईलाजास्तव २० रुपयाहून अधिक किमतीचे तिकीट खरेदी करावे लागत असल्याने त्यांना चांगलाच आर्थिक भुर्दंड सहन करावा लागतं आहे. शहरात कुठेही २,५ व १० रुपयांचे स्टॅम्प तिकीट कुठेही उपलब्ध नसून केवळ २० रुपयांपेक्षा वरील किमतीचे तिकीट विक्री होत आहे. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना नाहक त्रास व मनस्ताप सहन करावा लागत आहे. नुकताच परीक्षांचा निकाल लागला असून आगामी काळात प्रवेश प्रक्रियेला सुरुवात होणार आहे. त्यासाठी शैक्षणिक कामांकरिता दाखले काढण्यासाठी २,५, व १०, चे मुद्रांक तिकीट आवश्यक असल्याने तात्काळ तिकीट उपलब्ध करून देण्यात यावे. अशी मागणी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे शहराध्यक्ष - ऋतुराज राऊत यांच्या नेतृत्वात जिल्हा कोषागार अधिकारी यांना दिलेल्या निवेदनाद्वारे करण्यात आली.

निवेदन देतेवेळी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे शहराध्यक्ष - ऋतुराज राऊत यांच्या समवेत राष्ट्रवादी युवक काँग्रेस प्रदेश उपाध्यक्ष - आकाश हिवसे, प्रदेश सरचिटणीस -अभिषेक हजारे, राष्ट्रवादी युवक काँग्रेस अमरावती विधानसभा अध्यक्ष -प्रमोद धनाडे, बादल काळे, पियुष मोरे, राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे शहराध्यक्ष- संकेत बोके, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अमरावती शहर प्रसिद्धी प्रमुख - अमित तायडे, रायुकॉचे शहर उपाध्यक्ष मनीष पाटील, उज्वल पांडे, प्रथमेश बोके, सार्थक खोरगडे, पंकज शर्मा , शिवराज पाटील, शिवकुमार कैथवास, हर्षल रोंघे, आदित्य गुप्ता, अभिजित लोयटे, कार्तिक पाटील, अमन गुडधे, पंकज खंडाळकर, रवी वानखडे आदींसह राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

शुक्रवार दि ८ मे २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

जीवन प्राधीकरणचे करोडो रूपये 'पाण्यात'

# भ्रष्टाचाराची चतु:सूत्री, योजना कागदोपत्री !

## * योजना सुरू दाखवा आणि बक्षीस मिळवा * ४० वर्षापासून एकाही गावात सुरू नाही योजना *पाणी कर भरायचा कशाला?

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

ग्रामीण भागात जनतेला स्वच्छ पाणी देण्यासाठी शासनाच्यावतीने महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाच्या वतीने पेयजल योजना राबविण्यात येत आहे. मात्र ४० वर्षापासून वाशीम जिल्ह्यातील करोडो रूपये खर्च करून उभारलेल्या नळ योजनेतून अद्यापही जिल्ह्यातील कोणत्याच गावात पाणी पुरवठा सुरू झाला नसल्याचे चित्र आहे. ज्या गावात सुरू झाला त्या गावात मात्र कागदोपत्री दाखविण्यात आला आहे. त्यामुळे शासनाचे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे विभागाचे शेकडो करोडो रूपये तीन वेळा निधी येवूनही 'पाण्यात' गेले आहेत. या विभागात अधिकारी व ठेकेदाराच्या संगणमताने करोडो रूपयाचा महाघोटाळा झाला असून ही योजना सुरू नसतांनाही ग्रामपंचायतीकडून कर वसूली मात्र कशासाठी केल्या जाते असा प्रश्न जनतेला पडला आहे. आता ह्याच योजना जलजीवन मिशनच्या नावाखाली पुन्हा सुरू करण्याऐवजी भ्रष्टाचाराच केल्या जात आहे.फक्त





कारंजा शहरातच जलजीवन मिशनची नळ योजना सुरू आहे.

शासनाच्या वतीने ग्रामीण भागात पाणी पुरवठा करण्यासाठी जीवन प्राधिकरणची स्थापना करण्यात आली. मात्र या विभागातील अधिकारी व ठेकेदारांनी वाशीम जिल्ह्यात स्वातंत्र्य काळापासून राबविण्यात आलेल्या योजनेत अंतर्गत एकाही गावात प्रत्यक्षात पाणी पुरवठा केला नाही. भ्रष्टाचाराची वाळवी लागलेल्या ठेकेदारांनी व अधिकाऱ्यांनी संपूर्ण योजनाच हडप केली. लाखो रूपये पगार घेणाऱ्या अधिकाऱ्यांनी जनतेकडून मात्र कर वसूली केली. प्रत्यक्षात मात्र कुठेही पाणी पुरवठा केला नाही. आता या भ्रष्टाचारावर पडदा टाकण्यासाठी या योजनेचे पुनरूज्जीवन करून मुख्यमंत्री पेयजल कार्यक्रमांतर्गत बंद असलेल्या पाणी पुरवठा योजनेला शेकडो करोडो रूपयाचा निधी तीन वेळा प्राप्त झाले आहेत. या नळयोजना चालू करण्यासाठी सोलर पंपही बसविण्यात येणार आहे. आधिच्याच करोडो रूपयाचा घोटाळा करून सुरू न केलेल्या अर्धवट अवस्थेत असलेल्या ग्रामीण भागाच्या नळयोजना पुन्हा नव्याने सुरू करण्यासाठी मुख्यमंत्र्यांकडून निधी देण्यात आला. मात्र भ्रष्टाचाराने पोखरून टाकलेल्या अधिकारी व ठेकेदारांना आता जुन्या भ्रष्टाचारावर नवीन भ्रष्टाचार करायला संधी मिळणार आहे. अगोदरच करोडो रूपये खर्च करूनही कधीही न सुरू झालेली नळयोजना कागदोपत्री सुरू दाखविली होती. किंवा खाजगी नळयोजना ग्रामपंचायतीला हाताशी धरून आपली नळयोजना सुरू असल्याचे दाखविले आहे. आता ह्याच जुन्या नळयोजना जलजीवन मिशनच्या नावाखाली थातुरमातूर सुरू करून पुन्हा अधिकारी व ठेकेदार महाघोटाळ करण्याच्या तयारीत आहेत. त्यामुळे हक्काचे पाणी जनतेपर्यंत पोहोचल किंवा नाही याची श्वाश्वती देता येत नाही. त्यामुळे जुनी


जीवन प्राधीकरणचे करोडो रूपये 'पाण्यात'!

* योजना सुरू दाखवा आणि बक्षीस मिळवा * ४० वर्षापासून एकाही गावात सुरू नाही योजना *पाणी कर भरायची कशाला?

जिल्ह्यातील ५६ गावात पाणी पोहोचलेच नाही

करोडो रूपये भ्रष्टाचारातून कुठे वळविले...

नळाचे नव्हे तर तोंडचेही पाणी पळविले !

*जिल्ह्यात अनेक गावात तीव्र पाणी टंचाई * ४० वर्षापासून एकाही गावात सुरू नाही योजना

*तीन वेळा आला शेकडो कोटीचा निधी

नळयोजना सुरू दाखवा आणि बक्षीस मिळवा किंवा जनतेनी आता पाण्यासाठी पेटून उठायची गरज आहे. काही अधिकाऱ्यांनी या संबंधि विचारणा केली असता बंद पाणी पुरवठा योजना जिल्हा परिषदेकडे वळत्या करण्याची विनंती केली होती. मात्र त्या जिल्हा परिषदेने स्वीकारली नाही. तर योजना जिल्हा परिषदेला द्यायची असेल तर माग अधिकाऱ्यांना पगार कशाचा द्यायचा असा प्रश्न पडतो. अधिकारी व ठेकेदार योजनेत भ्रष्टाचार करून हडप करण्यासाठीच असतात काय? असा प्रश्न सर्व सामान्य जनतेला पडला आहे. त्यामुळे ह्या योजना सुरू करण्यासाठी गाव पातळीवर पाणी द्या अन्यथा पाणी पेटवा आंदोलन उभारण्याची गरज आहे.

---

## थोडक्यात

### जिवती पंचायत समिती टीमची हराळ ग्रामपंचायतला भेट




● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत पंचायत समिती जिवती जिल्हा परिषद चंद्रपूर येथील तपासणी टीम प्रमुख अतिथी म्हणून खालील उपस्थित. लक्ष्मीनारायण दोडके गटविकास अधिकारी, संकेत राज भोसले पंचायत राज विस्तार अधिकारी,गणेश जनेफर विस्तार अधिकारी शिक्षण ,नितीनजी फड शाखा व्यवस्थापक, मुकुंदजी नाईक पंचायत समिती रिसोड, राजेश आरू ग्रामपंचायत अधिकारी , रावसाहेब खिल्लारी ग्रामपंचायत अधिकारी, इजाज शेख शाखा व्यवस्थापक रिसोड, यांनी आदर्श गाव हराळ प.स रिसोड या ठिकाणी भेट मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान बाबत ग्राम हराळ येथे उपस्थित रिसोड तालुक्यातील हराळ येथील मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान बाबत मूल्यांकन केले हराळचे कामाबाबत समाधान व्यक्त केले.

### आ.सईताई यांच्या पुढाकाराने ग्रामदानांना मिळणार न्याय

ना.बावनकुळे यांच्या दालनात यशस्वी बैठक



● सिटी न्युज ब्युरो @ कारंजा ●

परिवर्तन हा सृष्टीचा नियम.ब्रिटिश काळात तयार झालेले कायदे आजच्या परिस्थितीत व्यवहार्य नाही,याबाबत केंद्रातील भाजपा सरकारने पुढाकार घेऊन भारतीय न्याय संहिता लागू केली.राज्यात सुद्धा महसूल प्रशासनाने अनेक कालबाह्य कायदे लक्षात घेऊन नागरिकांची विशेषतः ग्रामीण जनतेला दिलासा देणारे नवनवीन शासन निर्णय लागू केले.त्याचाच एक भाग म्हणून आचार्य विनोबा भावे यांच्या संकल्पनेतून सन १९६४ साली 'महाराष्ट्र ग्रामदान अधिनियम १९६४' हा कायदा अस्तित्वात आला.विशेष म्हणजे या संकल्पनेला संपूर्ण राज्यातून सर्वात प्रथम कारंजा तालुक्यातील तुळजापूर गावच्या ग्रामस्थांनी पाठिंबा दिला व दि.१५/०४/१९६७ रोजी तुळजापूर हे राज्यातील पहिले ग्रामदान मंडळ म्हणून अस्तित्वात आले.वास्तविक विनोबा भावे यांची संकल्पना त्याकाळी सन १९७८ पर्यंत फक्त १९ गावांना आवडली व ते ग्रामदान मंडळात सहभागी झाले होते.मात्र आपल्या पूर्वजांनी या अधिनियमात समाविष्ट होऊन घोडचूक केली त्या प्रयत्नांचा भाग म्हणून आज महसूल मंत्री यांच्या दालनात मंत्री महोदयांचे अध्यक्षतेखाली व आ.सईताई डहाके यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि संबंधित अधिकारी यांचे समवेत ग्रामदान अधिनियमाचे अनुषंगाने सर्व समस्या आणि कालबाह्य झालेला हा कायदा निरस्त करण्यासंबंधी सविस्तर चर्चा झाली.या चर्चेत मा.अमरावती विभागीय आयुक्त श्वेता सिंघल,जिल्हाधिकारी वाशिम कुंभेजकर,भूमी अभिलेख कारंजा उप अधिक्षक जाधव व अन्य संबंधित अधिकारी उपस्थित होते.पुढील १५ दिवसांत या ग्रामदान अधिनियमास निष्कासित करण्याचे दृष्टीने संबंधित विभागाने अहवाल सादर करण्याचे निर्देश माननीय महसूल मंत्री महोदयांनी संबंधित प्रशासनास देऊन येत्या पावसाळी अधिवेशनात याबाबत रीतसर घोषणा करण्याबाबत सुतोवाच केल्याने आता या कायद्याच्या जाचातून अनेक शासकीय योजनांपासून वंचित राहत असलेल्या बळीराजाची सुटका होणार असल्याने संबंधितांनी महसूल मंत्री व आमदार सई ताई डहाके यांचे आभार मानले.

---

# पतीच्या हिस्स्याची मालमत्ता नाकारत विधवेला जीवे मारण्याची धमकी !

## खरटकर कुटुंबातील भावकीचा वाद चिघळला; दोघांविरुद्ध तक्रार दाखल

● सिटी न्युज ब्युरो @ केनवड ●

पतीच्या निधनानंतर सासऱ्यांनी मृत्यूपत्राद्वारे दिलेल्या वडीलोपार्जित संपत्तीमधील आपला हिस्सा मिळावा, अशी मागणी करणाऱ्या एका विधवा महिलेला शिवीगाळ, धक्काबुक्की करत जीवे मारण्याची धमकी दिल्याची गंभीर घटना वाशीम शहरात घडली. याप्रकरणी महिलेने वाशीम शहर पोलीस ठाण्यात जबानी रिपोर्ट दाखल केला आहे.

संगीता सुभाष खरटकर (वय ५०, रा. राजणी चौक, शुक्रवारपेठ, वाशीम) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांच्या पतीचे २००९ मध्ये निधन झाले. सासरे स्वर्गीय मारोती खरटकर यांनी ते जीवंत असताना त्यांच्या संपत्तीची समान वाटणी करण्याबाबतचे मृत्यूपत्र करून ठेवले होते. मात्र ,त्यांचे पती सुभाष खरटकर यांचे निधनानंतरही त्यांच्या हिस्स्यावर येणारी सायकल दुकान, घर, खोली व गोडाऊन यांचा ताबा देण्यात आला नसल्याचा आरोप पोलीसात दिलेल्या तक्रारीत त्यांनी केला आहे.



दरम्यान, ६ मे रोजी रात्री साडेआठच्या सुमारास संगीता खरटकर या मालमत्तेबाबत विचारणा करण्यासाठी त्यांचे भाया शिवकुमार खरटकर यांच्या ताब्यात असलेल्या पाटणी चौकातील दुकानात गेल्या असता, त्यांच्याशी शिवकुमार खरटकर आणि त्यांची पत्नी रत्नमाला खरटकर यांनी वाद घातला. 'तुम्हाला काहीही देणार नाही, तुम्ही आमचे काहीही बिघडवू शकत नाही,' कारण आमचा मुलगा मंत्र्याचा पीऐ आहे असे म्हणत शिवीगाळ, धक्काबुक्की करून जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप या तक्रारीत करण्यात आला आहे.

या प्रकरणामुळे शहरात खळबळ उडाली असून, एका विधवा महिलेला न्यायासाठी पोलीस ठाण्याची पायरी चढावी लागल्याने संताप व्यक्त होत आहे. संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणी करून पोलीसांनी न्याय व संरक्षण द्यावे अशी मागणी संगिता सुभाष खरटकर यांनी या तक्रारीद्वारे केला आहे.

## एस.टी. आरक्षण अभ्यास समितीने पाच महिन्यांचा अहवाल जाहीर करावा !

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

गोरसेनेची राज्यभर निवेदनांद्वारे सरकारकडे मागणी

गोरबंजारा समाजाच्या एस.टी. आरक्षणाच्या मागणीसंदर्भात राज्य सरकारने स्थापन केलेल्या अभ्यास समितीने गेल्या पाच महिन्यांत नेमके कोणते काम केले, याचा सविस्तर अहवाल समाजासमोर जाहीर करावा, अशी ठाम मागणी गोरसेनेच्या वतीने करण्यात आली आहे.

या मागणीसाठी गोरसेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. संदेश चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली राज्यभर ३०० हून अधिक ठिकाणी जिल्हाधिकारी, तहसीलदार व उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदने देण्यात आली. निवेदनावेळी गोरसेनेचे जिल्हाध्यक्ष किशोर जाधव , जिल्हासचिव निलेश राठोड , तालुकाध्यक्ष, तालुका सचिव, समनक जनता पार्टीच्या महिला आघाडी जिल्हाध्यक्षा शितल विष्णू राठोड, महानंदाबाई राठोड, वनिता पवार, सुरेखा राठोड, कल्पना राठोड, किरण राठोड, सेवालाल महाराज संस्थान वाशिम चे नेमीचंद चव्हाण महाराज तसेच पदाधिकारी तसेच मोठ्या संख्येने गोरसेनेचे कार्यकर्ते उपस्थित होते.

## लग्न मंडपावर सोलर खांब पडून अपघात ; ६ जखमी २ गंभीर



● सिटी न्युज ब्युरो @ मानोरा ●

मानोरा तालुक्यातील वडगाव येथे सोलर खांब विद्युत तारांवर कोसळून अपघात झाल्याची घटना घडली.यामध्ये ६ जण जखमी तर २ जण गंभीर जखमी झाले असून त्यांना उपचारासाठी यवतमाळ येथे हलविण्यात आले असल्याची प्राथमिक माहिती आहे.

वाशीमच्या मानोरा तालुक्यातील वडगाव येथे वादळी वाऱ्यामुळे ग्रामपंचायतीचा सोलर खांब विद्युत तारांवर कोसळून अपघात झाल्याची घटना आज दुपारी घडली.या घटनेत सोलर खांब विद्युत तारांवर पडल्याने विद्युत तारा तुटून थेट लग्न मंडपावर पडल्याने एकच गोंधळ उडाला होता. यामध्ये सहा जण जखमी झाले असून विजेचा शॉक लागून काही जण किरकोळ जखमी झाले.

तर सोलर खांब अंगावर पडल्याने २ महिला गंभीर जखमी झाली आहेत. गंभीर जखमी महिलेला उपचारासाठी यवतमाळ जिल्ह्यातील दिग्रस येथे दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहे. अचानक घडलेल्या या घटनेमुळे लग्नस्थळी काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

## चोरटे झाले भक्ष; ठाणेदार साहेब द्या लक्ष...

# शेतीतील साहित्याची चोरी, वाढवा फेऱ्या !

● सिटी न्युज ब्युरो @ केनवड ●

शिरपूर पोलीस स्टेशन अंतर्गत असलेल्या ग्राम केनवडसह परीसरात सतत वाढत असलेल्या चोरीच्या घटनांमुळे ग्रामस्थ व शेतकरी भयभीत झाले आहेत. दि. ५ मे २०२६ रोजी केनवड येथील शेतशिवारात अनेक शेतकऱ्यांच्या स्प्रिंकलर संच, मोटारपंप केबल तसेच शेतीविषयक साहित्याची चोरी झाल्याची घटना उघडकीस आली आहे.ठाणेदार साहेब परीसरात चोऱ्यांचे प्रमाण वाढले आहे शेतकरी भयभीत झाले आहे.तरी आपल्या फेऱ्या वाढवा अशी मागणी केनवड सह परीसराती शेतकऱ्यांनी केली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, बंडू ज्ञानबा खराटे यांच्या शेतातील मोटारपंपाची केबल, स्प्रिंकलरचे नोझल व इतर शेती साहित्य चोरट्यांनी लंपास केले. तसेच रामदास अरुण खराटे यांच्या शेतातील सुमारे ७०० फूट केबल, शेतीविषयक साहित्य तसेच शेतातील शेडमधील साहित्य चोरी करण्यात आले.याचबरोबर साहेबराव चिनकाजी खराटे यांच्या शेतातील स्प्रिंकलर तोट्या, केबल व इतर साहित्य चोरीला गेले आहे. लक्ष्मण कोंडूजी खराटे तसेच ज्ञानेश्वर तुकाराम खराटे यांच्या शेतातील मोटारपंपाच्या केबलही चोरट्यांनी चोरून नेल्या आहेत.विशेष म्हणजे, चोरट्यांनी चोरी केलेले साहित्य काही ठिकाणी जाळून त्यामधील तांब्याच्या तारा वेगळ्या काढून नेल्या असून उर्वरित साहित्य जागेवरच टाकून दिले आहे. वाढत्या चोरीच्या घटनांमुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.दरम्यान, शिव-दत्त नगर परिसरामध्ये भर दिवसा दुपारी चार वाजताच्या सुमारास प्रल्हाद शामराव काळे यांची एमएच-३७-एके-३५७७ क्रमांकाची दुचाकी चोरीला गेल्याची घटना घडली आहे. त्यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये अधिकच भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.या चोरीमुळे शेतकरी व नागरिकांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले असून नुकसानग्रस्तांना पंचनामे करून आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी होत आहे.

तसेच चोरीच्या घटनांवर आळा घालण्यासाठी शिरपूर पोलीस स्टेशनचे ठाणेदार वाघ साहेब यांनी गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने कारवाई करावी, अशी मागणी गावकरी व शेतकरी करीत आहेत.

# सुई-दोऱ्याने विणले यशाचे इंद्रधनुष्य, महिलांच घडवतात महिलांचे भविष्य !

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

## जयश्री पाटील या उद्योजिकेचा प्रेरणादायी प्रवास

एकदा विवाह झाला की संसाराच्या कचाट्यात सापडलेल्या अनेक स्त्रियांची शैक्षणिक स्वप्ने अधुरी राहतात. चूल आणि मुलं या चाकोरीबद्ध चौकटीत अडकून त्या स्वतःच्या पायावर उभे राहण्यास असमर्थ ठरतात. मात्र या सर्व समस्यांवर मात करून शिक्षणाचे स्वप्न पूर्ण करणाऱ्या स्त्रिया समाजासाठी ' हिरकणी ' ठरतात. अशीच एका हिरकणीची यशोगाथा आज समाजासाठी एक आदर्श ठरत आहे.

रिसोड तालुक्यातील महागाव येथील तेजनकर परिवाराची लेकबाळ आणि मोपच्या नरवाडे कुटुंबाची सून असलेल्या सौ. जयश्री पाटील हिने अगदी प्रतिकूल परिस्थितीत अफाट जिद्द आणि चिवट मेहनतीच्या बळावर स्वतःच्या व्यवसायाचे शून्यातून स्वराज्य निर्माण तर केलेच पण या यशात होरपळून न जाता उच्च शिक्षणाचे ध्येय पूर्ण करण्यासाठी नुकतीच मास्टर ऑफ आर्ट ( M.A. ) ची परीक्षा दिली आहे. जयश्री लेडीज फॅशन डिझायनर अँड शिवण क्लासेसच्या माध्यमातून त्या ईतर महिलांना सुद्धा स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी सक्षम करत आहेत. परिणामी संपूर्ण जिल्ह्यात जयश्री पाटील फॅशन डिझायनर ते महिला सक्षमीकरणाच्या ब्रँड ठरत आहेत.



दिवसभर ऑर्डरचे शिवणकाम आणि रात्री अभ्यास. अशातच १५ ऑगस्ट स्वातंत्रदिनी पुत्ररत्न जन्माला आले आणि त्याचे' जयवंत ' नामकरण केले. तेंव्हापासून माझ्या प्रत्येक ध्येयाला ' जय ' मिळत असल्याने मी माझ्या व्यवसायाला जयश्री असे नाव दिले !

**जयश्री पाटील** (संचालक, जयश्री लेडीज फॅशन डिझायनर अँड शिवण क्लासेस )

जिल्ह्यातील रिसोड तालुक्यात येत असलेल्या महागाव येथील स्व. भागवत महाराज तेजनकर यांची कन्या रेखा भागवत तेजनकर या शालेय जीवनातच एक कुशाग्र बुद्धिमत्ता असलेली हुशार विद्यार्थिनी म्हणून ओळखली जात होती. मात्र सामाजिक परंपरे नुसार इयत्ता दहावी पास झाल्यानंतर त्यांचा विवाह मोप येथील नरवाडे परिवारात झाला. आणि आस असूनही पुढील शिक्षण आता थांबणार ! असं सर्वांनाच वाटलं होतं. परंतु रेखा तेजनकर ही मुलगी हाडाच्या जिद्दी होती. संस्कृत विषयात पदवीधर असलेले वडील स्व. भागवत महाराज यांचे संस्कार अखेर मुलीच्या कामी पडले. पुढील शिक्षण पूर्ण करण्याची ईच्छा त्यांनी सासरच्या मंडळीकडे व्यक्त केली. यात पती,सासू, सासऱ्यांनी भरीव योगदान देत सौ. रेखा नरवाडे यांना शिक्षणाचे दार उघडे करून दिले. याच बळावर ' लग्न झालं की शिक्षण संपलं ' हा समाजाचा समज खोटा ठरवत रेखा यांनी वयाच्या ३३ व्या वर्षी म्हणजेच मे २०२६ मध्ये एम. ए. ची परीक्षा देत उच्च शिक्षणाचे शिखर गाठले. सन २०१३ मध्ये विवाह झाल्यानंतर १२ वी पास करून लेडीज फॅशन डिझायनरचा कोर्स पूर्ण केला. आणि सन २०१८-१९ पासून त्यांनी लेडीज स्पेशालिस्ट म्हणून शिवणकाम सुरू केले. व गेल्या चार वर्षांपासून त्या शिवण क्लासेस घेत अनेक महिलांना स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी धडे देत आहेत. कुशाग्र बुद्धी आणि अंगीकृत असलेल्या कौशल्याच्या बळावर त्या आज जयश्री मॅडम म्हणून संपूर्ण जिल्ह्यात लेडीज फॅशन डिझायनर आणि महिला सक्षमीकरणाच्या ब्रँड ठरत आहेत. आजमितीस त्यांच्याकडे अनेक युवती, महिला शिवण कामाचे प्रशिक्षण घेत आहेत. एक महिला म्हणून स्वतःवर बिटतलेली परिस्थिती ईतर महिलांवर येऊ नये म्हणून आपण हा व्यावसायिक उपक्रम सुरू केला असल्याचे जयश्री पाटील यांनी खास सिटीन्यूज सुपरफास्टशी बोलतांना सांगितले आहे.

याची व्याप्ती वाढावी म्हणून आपण शासकीय योजनेच्या माध्यमातून हा व्यवसाय लवकरच एक उद्योग म्हणून नावारूपास आणू असा मनोदय सुद्धा त्यांनी प्रस्तुत प्रतिनिधीशी बोलतांना व्यक्त केला आहे.

तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयाच्या वतीने...

## थॅलेसेमिया मुक्त अभियान

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

वाशिम तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयाच्या वतीने ''एक पाऊल थॅलेसेमिया मुक्तीकडे''या अभियानाची सुरुवात डॉ.पांडुरंग ठोंबरे सर जिल्हा आरोग्य अधिकारी,श्री. पुरुषोत्तम इंगोले जिल्हा सिकलसेल कार्यक्रम समन्वयक ञ्श वाशिम यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार करण्यात आली आहे .दिनांक ०१ ते ०८ मे दरम्यान साजरा होणाऱ्या थॅलेसेमिया सप्ताह निमित्त विविध जनजागृती उपक्रम राबविण्यात येत आहेत या उपक्रमाला तालुका आरोग्य अधिकारी डॉ चव्हाण मॅडम यांच्या उपस्थितीत शुभारंभ करण्यात आला हा आजार रक्ताशी संबंधित आहे.

हा अनुवंशिक आजार असून तो पालकाकडून मुलांमध्ये जातो भारतात याबालके जन्माला येऊ नयेत यासाठी तरुणांनी विवाहपूर्वक थॅलेसेमियाची तपासणी करून घेने अत्यावश्यक आहे. वाहक व्यक्तींनी परस्पर विवाह टाळल्यास या आजारावर नियंत्रण मिळवणे शक्य असल्याचे प्रतिपादन वाशिम तालुका आरोग्य अधिकारी डॉ. चव्हाण मॅडम यांनी केले. गर्भवती महिलांसाठी विशेष तपासणी सुविधा आरोग्य कर्मचारी व आशा



कार्यकर्त्यामार्फत जनजागृती व आजारा विषयी पूर्ण माहिती व मार्गदर्शन तालुका सिकलसेल सहाय्यक श्री संजय गंगावणे यांनी केले.

काय आहे थॅलेसेमियाचे प्रकार .१) थॅलेसेमिया मायनर ( वाहक अवस्था) व्यक्तीला लक्षणे कमी असतात .परंतू तो आजार पुढे देऊ शकतो.थॅलेसेमिया इंटरमिडिया मध्यम स्वरूपाचा आजार आहे.२) थॅलेसेमिया मेजर:- गंभीर प्रकार , नियमित रक्त चढवणे आवश्यक.

कशी करावी तपासणी.:- CBC ( Complete Blood count) प्राथमि तपासणी.

HB Electrophoresis/ HPLC टेस्ट थॅलेसेमिया निश्चित ओळखण्यासाठी महत्वाची. कौटुंबिक (Genetic)सल्ला- विवाहपूर्व मार्गदर्शनसाठी आवश्यक गर्भधारणे दरम्यान तपासणी गर्भातील बाळाची स्थिती तपासण्यासाठी.

सिटी न्यूज सुपरफास्ट बुलडाणा
शुक्रवार, दि. ८ मे २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# बसस्थानकाचा 'तिसरा डोळा' बंद!
## महिला व भाविकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

प्रतिनिधी ८ मे



**चिखली:** चिखली घाटमाथ्यावरील अत्यंत महत्त्वाचे आणि सतत वर्दळीचे केंद्र असलेल्या चिखली बसस्थानकातील सीसीटीव्ही कॅमेरे बंद पडल्याने प्रवाशांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. पोलिसांचा 'तिसरा डोळा' मानली जाणारी सीसीटीव्ही यंत्रणाच निष्क्रिय झाल्यामुळे चोरटे, पाकीटमार, महिलांची छेडछाड करणारे आणि प्रवाशांना लुबाडणाऱ्या टोळ्यांचे धाडस वाढल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे.

विदर्भ-मराठवाडा जोडणारा वरुड मार्ग, खामगाव-जालना हा महत्त्वाचा वाहतूक मार्ग तसेस चिखली-मलकापूर-सोलापूर राज्य महामार्ग या तिन्ही प्रमुख मार्गावरील मोठा वाहतूक केंद्रबिंदू म्हणून चिखली बसस्थानक ओळखले जाते. तालुक्यासह परिसरातील हजारो प्रवासी दररोज या बसस्थानकावरून प्रवास करतात. याशिवाय प्रसिद्ध सैलानी दर्गावर जाणारे भाविक देखील याच मार्गाचा वापर करतात. बुलढाणा जिल्ह्यासह इतर राज्यां मधूनही मोठ्या संख्येने भाविक येथे येत असतात. मात्र एवढ्या महत्त्वाच्या ठिकाणी सीसीटीव्ही यंत्रणाच बंद असल्याने सुरक्षेचा प्रश्न अधिक गंभीर बनला आहे. रात्री बसची प्रतीक्षा करणाऱ्या प्रवाशांना लक्ष्य करणाऱ्या टोळ्या सक्रिय झाल्याची तक्रार आहे. पाकीटमारी, महिलांचे दागिने चोरी, छेडछाड यांसारख्या घटना घडल्यास आरोपींचा माग काढणे पोलिसांसाठी अवघड ठरत आहे.

विशेष म्हणजे चिखली बसस्थानकातून बाहेर पडणाऱ्या तीनही प्रमुख मार्गांवर एकही सक्रिय कॅमेरा नसल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. त्यामुळे गुन्हेगार घटना घडवून सहज पसार होत असल्याचे सांगितले जात आहे. सीसीटीव्ही फुटेज उपलब्ध नसल्याने अनेक वेळा पोलिसांनाही तपासात अडचणींचा सामना करावा लागत आहे. याबाबत चिखली डेपो तसेच बुलढाणा विभागीय कार्यालयाशी संपर्क साधला असता, संबंधित यंत्रणेचे नियंत्रण महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या मुंबई येथील मुख्य कार्यालयाकडून होत असल्याचे सांगण्यात आले.

एकीकडे शासन आधुनिक तंत्रज्ञानाचा गाजावाजा करत असताना दुसरीकडे हजारो प्रवासी व भाविकांची वर्दळ असलेल्या महत्त्वाच्या बसस्थानकातील सुरक्षा यंत्रणाच बंद असल्याने नागरिकांत तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. तातडीने सीसीटीव्ही यंत्रणा सुरू करून बसस्थानक परिसरात कडक सुरक्षा व्यवस्था लागू करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे

# बोथाकाजी येथे तब्बल ३० वर्षानंतर भरली माजी विद्यार्थ्यांची पुन्हा शाळा
## 'गेट टुगेदर:जिल्हा परिषद शाळेतील आठवणींना मिळाला उजाळा

प्रतिनिधी ८ मे



**खामगाव :** तब्बल ३० वर्षांपूर्वी एकत्र शिकत असलेल्या माजी विद्यार्थ्यांची पुन्हा एकदा शाळा भरली. तालुक्यातील जिल्हा परिषद हायस्कूल मध्ये १९९६-९७ बॅचच्या विद्यार्थ्यांनी गेट-टुगेदरच्या माध्यमातून त्याकाळी बाकांवरच्या मित्र-मैत्रिणी सोबतच्या जुन्या आठवणींना उजाळा दिला. तर सेवानिवृत्त शिक्षकांनी या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. खामगाव तालुक्यातील बोथा काजी येथील जिल्हा परिषद हायस्कूलमध्ये १९९६-९७साली इयत्ता १० वीमध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांचे गेट टुगेदर नुकतेच पार पडले. या स्नेहसंमेलनात २८ विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होत्या. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी ज्येष्ठ शिक्षक प्रा. विजय खंडारे होते तर शिक्षक एस.आर.गवई, पी. के. खोडके, डी.बी.जेऊघाले, ए.डी.बोराडे यांची प्रमुख उपस्थिती होती. सर्वप्रथम सर्व शिक्षकांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून हारार्पण करण्यात आले. यानंतर विद्यार्थिनी सीमा दराडे, वर्षा इंगळे, पंचकुला कस्तुरे, मीरा डिक्कर, संगीता ढोरे यांच्या हस्ते प्रा. विजय खंडारे यांचा तसेच विद्यार्थ्यांच्या हस्ते उपस्थित शिक्षकांचा शाल, पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन सन्मान करण्यात आला. मागील दोन ते तीन महिन्यापासून गेट-टुगेदर साठी सर्व विद्यार्थ्यांचे नियोजन सुरू होते. त्या नियोजनाला मूर्तीमंत रूप आले. खेळीमेळीच्या वातावरणात हा कार्यक्रम पडला. संचालन महादेव पाटील यांनी तर आभार नाना हिवराळे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी राहुल कस्तुरे, नूर खान पठाण, गौतम वाकोडे, विजय सुरवाडे, रितवान शेगोकार,परमेश्वर सरोदे, संजय पारखेडे, संदीप कस्तुरे, शत्रुघ्न वानखडे, दीपक पाठक, प्रमोद रिंढे,प्रदीप कस्तुरे, भगवान टिकार, सलीम शहा अकबर शहा, विनोद रिंढे, गोपाल माहोरकार, गोविंदा हागे, कैलास आरज, अशोक तायडे यांनी परिश्रम घेतले.त् चौकट - पुन्हा लाकडी बाकावर बसल्याने मिळाला आनंद - ३० वर्षानंतर सर्व विद्यार्थ्यांना एकत्रित पाहून शिक्षक समाधानी झाले.तर सर्व विद्यार्थी आपापल्या क्षेत्रात काम करत आहेत, याचा फायदा समाजातील गरीब गरजू विद्यार्थ्यांना होण्यासाठी पुढाकार घ्यावा.असे मत व्यक्त केले.

# क्षुल्लक कारणावरून दोन गटात राडा; मस्तान चौक परिसरात दगडफेक

प्रतिनिधी ८ मे

**खामगाव:** खामगाव शहरातील अतिसंवेदनशील मानल्या जाणाऱ्या मस्तान चौक ते निर्मळ टर्निंग दरम्यान गुरुवारी रात्री दोन गटात शुल्लक कारणावरून वाद होऊन त्याचे रूपांतर तुफान दगडफेकीत झाले. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून भीतीचे वातावरण पसरले होते.घटनेची माहिती मिळताच शहर पोलीस स्टेशनचे ठाणेदार रामकृष्ण पवार यांनी तातडीने पथकासह धाव घेत परिस्थितीवर नियंत्रण मिळविले. घटनेचे



गांभीर्य ओळखून उपविभागीय पोलीस अधिकारी प्रदीप पाटील हे देखील घटनास्थळी दाखल झाले होते.सध्या परिसरात तणावपूर्ण शांतता असून परिस्थिती नियंत्रणात आहे.

खबरदारीचा उपाय म्हणून शहरात आणि विशेषतः संवेदनशील भागात तगडा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये आणि शांतता राखावी, असे आवाहन पोलीस प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# गॅस टंचाईमुळे इंडक्शन, इलेक्ट्रिक शेगड्यांचा वापर

प्रतिनिधी ८ मे

**खामगाव:** स्वयंपाकाच्या गॅसच्या वाढत्या किमती, अधूनमधून भासणारी टंचाई यामुळे अनेक कुटुंबांनी इंडक्शन, इलेक्ट्रिक शेगड्यांचा वापर वाढविला आहे. यामुळेही विजेच्या लोडमध्ये भर पडत आहे.



संध्याकाळी वाढतो सर्वाधिक ताण सध्या दिवसा सौरऊर्जेचा आधार मिळत असला, तरी संध्याकाळी सहानंतर सोलर उत्पादन थांबताच विजेची मागणी अचानक वाढत आहे. याच वेळेत घराघरांत एसी, कुलर, पंखे मोठ्या प्रमाणात सुरू होत असल्याने यंत्रणेवर ताण येत आहे. त्यामुळे सहा ते नऊ या कालावधीत भार नियंत्रित करण्याची गरज भासत आहे. दर १५ मिनिटांनी मागणी, पुरवठ्याचा आढावा! राज्यस्तरीय लोड डिस्पॅच सेंटरमार्फत दर १५ मिनिटांनी वीज मागणी आणि उपलब्ध पुखठ्याचा ताळमेळ तपासला जातो.

# वाढत्या उष्णतेमुळे विजेच्या मागणीत वाढ
## कूलर, एसीचा वापर वाढला : ग्रामीण भागात भारनियमन

प्रतिनिधी ८ मे

**खामगाव:** राज्यात उन्हाची तीव्रता दिवसेंदिवस वाढत असून, त्याचा थेट परिणाम विजेच्या मागणीवर दिसून येत आहे. वाढत्या उष्णतेमुळे जिल्ह्यात विजेची मागणी ऐतिहासिक पातळीवर पोहोचली आहे. जिल्ह्यात सूर्य आग ओकत असून, पारा ४२ अंशांच्या पार गेला आहे. उष्णतेपासून बचावासाठी दिवसरात्र फॅन, कुलर, एसीचा वापर होत आहे. यामुळे घरगुती वीज वापर वाढत आहे.

दिवसा सौरऊर्जेमुळे काही प्रमाणात वीजपुरवठा सुरळीत राहत असला, तरी संध्याकाळी सौरऊर्जा उपलब्ध राहत नसल्याने संपूर्ण भार पारंपरिक यंत्रणेवर येत आहे. त्यामुळे मागणी व पुरवठ्यातील तफावत वाढत असून, सायंकाळदरम्यान मागणीत वाढ होत असल्याची माहिती महावितरणकडून देण्यात आली आहे.

उन्हाळ्याच्या दिवसात विजेची मागणी वाढते. यंदा कडक उन्हाळा जाणवत असून, घरोघरी पंखे, कुलर, एसी, आदी साधनाचा वापर वाढला.

प्रत्येक उपकेंद्र व फीडरवर स्मार्ट मीटर बसविण्यात आल्याने आता दर ५ मिनिटांनी वीज वापराची माहिती मुख्यालयास मिळणे शक्य झाले आहे. त्यामुळे अनावश्यक भार ओळखून तो तत्काळ कमी करण्यास मदत मिळत आहे

जिल्ह्यात सध्या नियोजित भारनियमन नसल्याचे महावितरणकडून स्पष्ट करण्यात आले; मात्र अत्यावश्यक परिस्थितीत काही भागांत 'इमर्जन्सी लोडशेडिंग' लागू केले जात असून, ही प्रक्रिया प्रामुख्याने संध्याकाळच्या सुमारास राबविली जात आहे. एप्रिल महिन्यातच मागणीने उच्चांक गाठला होता. मे महिन्यात तापमानात आणखी वाढ होत असल्याने, जिल्ह्याची विजेची मागणी वाढली आहे.

# बनावट कागदपत्रांद्वारे प्लॉट विक्री; सहाजणांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा

प्रतिनिधी ८ मे

**जळगाव जामोद:** शहरातील प्लॉट खरेदी व्यवहारात बनावट कागदपत्रे तयार करून ५ लाख ७० हजार रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी जळगाव जामोद पोलिसांनी सहाजणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत मनीषकुमार भिकमचंद गांधी (रा. जामोद) यांनी फिर्याद दिली. त्यानुसार ए. हबीब मो. मुसा, मो. शरीफ मो. मुसा, मो. मुस्ताक मो. इसा, एजाज मुस्ताक देशमुख, साबीर ए. हबीब व सह दुय्यम निबंधक सुनील पंढरी चव्हाण (सर्व रा. जळगाव जामोद) यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता १८६० मधील कलम ४२०, ४६८, ४७१ व ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जळगाव जामोद येथील नझुल व नगरपरिषद क्षेत्रातील शीट क्र. १५-सी मधील प्लॉट क्रमांक ५६ ही जागा फिर्यादी यांना विक्रीसाठी दाखविण्यात आली होती. सदर जागा 'वर्ग-य' प्रकारातील असल्याने खरेदीसाठी शासनाची परवानगी आवश्यक होती. त्यामुळे १३ डिसेंबर २०२१ रोजी सौदाचिठ्ठी करण्यात आली होती. जागेची एकूण किंमत ५ लाख ८० हजार रुपये ठरविण्यात आली असून त्यापैकी ५ लाख ७० हजार रुपये धनादेशाद्वारे आरोपींना देण्यात आले होते.

त्यानंतर शासनाची परवानगी प्रलंबित असतानाच आरोपींनी संगनमत करून मालमत्तेच्या आखीव पत्रिकेत संगणकाद्वारे फेरफार करत 'वर्ग-य' ऐवजी 'अ वर्ग धारणाधिकार' असा बदल केल्याचा आरोप आहे. त्यानंतर सदर मालमत्तेचे खरेदीखत आरोपींपैकी एकाच्या नावावर नोंदणी करण्यात आल्याचे चौकशीत समोर आले.

# कारची धडक; दुचाकी चालकाचा जागीच मृत्यू
## ◆घटनेनंतर कारचालक घटनास्थळावरून पसार ◆अपघातानंतर कारचा झालेला चुराडा

प्रतिनिधी ८ मे

**खामगाव:** खामगाव-शेगाव रोडवरील मंगल कार्यालयाजवळ गुरुवारी दुपारी भीषण अपघात घडला. भरधाव चारचाकी वाहनाने दुचाकीला जोरदार धडक दिल्याने दुचाकी चालकाचा जागीच मृत्यू झाला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, एमएच २७ एम २४६२ क्रमांकाची दुचाकी आणि एचआर ५० सी २०३३ क्रमांकाचे चारचाकी वाहन दुपारी एक वाजेच्या सुमारास समोरासमोर धडकले. धडक




इतकी भीषण होती की दुचाकीचालक गंभीर जखमी होऊन घटनास्थळीच मृत्युमुखी पडला. नागरिकांनी तातडीने पोलिसांना माहिती दिल्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. मृत व्यक्तीच्या खिशात महेश शंकरराव राऊत (फॉरेस्ट कॉलनी, परतवाडा, ता. अचलपूर) यांच्या नावाचे वाहन परवाना आढळून आल्याची माहिती समोर आली आहे; मात्र मृताची अधिकृत ओळख पटविण्याचे काम पोलिसांकडून सुरू आहे. दरम्यान, अपघातानंतर काही काळ खामगाव-शेगाव मार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली होती. पोलिसांनी वाहतूक सुरळीत करत पुढील तपास सुरू केला आहे.

# पंचायत राज स्पर्धेच्या मुल्यमापनासाठी पथक दाखल ,10 ग्रा. पं. च्या कामांची होणार तपासणी

प्रतिनिधी ८मे

**संग्रामपूर:** मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान स्पर्धेत सहभागी असलेल्या संग्रामपूर तालुक्यातील १० ग्रा.पं. च्या कामाचे मूल्यमापन करण्यासाठी ६ मे रोजी रामटेक पंचायत समितीचे पथक तालुक्यात दाखल झाले.

गटविकास अधिकारी माधव पायगन यांनी पंचायत समिति कार्यालयात या पथकातील सर्व अधिकारी कर्मचारी सदस्यांचे पंचायत समितीच्यावतीने यथोचीत स्वागत केले. यानंतर आज काथरगाव पिप्री व काकणवाडा खुर्द या दोन ग्रामपंचायतीने त्यांचे गावात केलेल्या विविध विकास कामांची पाहणी या पथकाने केली तर उर्वरित गावची पाहणी उद्या गुरुवार रोजी करण्यात येणार आहे. या

### ◆ जाहीर आवाहन

स्पर्धेत पळशी झाशी काकणवाडा खुर्द कळमखेड लाडनापुर वानखेड वकाना रूधाना काटेल भोन लाडणापूर या १० ग्रा. पं. नी सहभाग घेतला असून या सर्व गावची पाहणी हे पथक करणार आहे.

पाहणीचा अहवाल शासनाला सादर झाल्यावर तालुका स्तरावरीलतीन ग्रापं ना रोख पुरस्कार देण्यात येणार आहे त. रामटेक येथून आज येथे आलेल्या या पथकात त्या पंचायत समितीचे बीडीओ जयसिंग जाधव पंचायत विस्तार अधिकारी कोल्हे आरोग्य विस्तार अधिकारी डॉ. दिघडे सांख्यिकी विस्तार अधिकारी जगणे शाखा अभियंता जाधव इत्यादी सदस्य या पथकात सहभागी आहेत.

# अवैध नळ जोडण्याविरोधात खामगाव पालिकेची धडक मोहीम
## ◆ शहरातील २०० नागरिकांना नोटिसा; पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी प्रशासन सक्रिय

प्रतिनिधी ८मे

**खामगाव:** शहरातील वाढत्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर पाणीपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी खामगाव नगरपरिषदेच्या पाणीपुरवठा विभागाने अवैध नळ जोडण्यां विरोधात विशेष मोहीम हाती घेतली आहे. शिवाजीनगर, फाटकपुरा आणि शौकत कॉलनी परिसरात सुरू असलेल्या या मोहिमेदरम्यान आतापर्यंत सुमारे २०० नागरिकांना नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. त्यापैकी ५५ नागरिकांनी दंड भरून आपल्या नळ जोडण्या नियमित केल्या आहेत.

नगरपरिषदेकडून पाण्याचा अपव्यय रोखणे, अनधिकृत वापर थांबविणे आणि सर्व नागरिकांना समान व नियोजनबद्ध पाणीपुरवठा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने ही कारवाई सुरू आहे. प्रशासनाच्या माहितीनुसार, काही भागांमध्ये अवैध नळ जोडण्यांमुळे पाण्याचा दाब कमी होत असून, नियमित कर भरणाऱ्या नागरिकांना त्याचा फटका बसत आहे. त्यामुळे नगरपालिका प्रशासनाने आक्रमक पवित्रा घेतला आहे. नगरपरिषदेकडून पुढील आठवड्यात अवैध नळ जोडण्या थेट खंडित करण्याची कारवाई करण्यात येणार असल्याचे संकेत देण्यात आले आहेत. त्यामुळे नागरिकांनी स्वयंस्फूर्तीने जोडण्या नियमित करण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे. सध्या रावणटेकडी जलयोजनेवरून शहरातील अनेक भागांना चार दिवसांआड पाणीपुरवठा केला जात आहे. यात सतीफैल, जुना फैल, नवा फैल, शिवाजीनगर, बर्डे प्लॉट, निळकंठनगर, राणा गेट, फाटकपुरा, शौकत कॉलनी, पसारकड देवी परिसर, रुख्मिणीनगर, गांधी नगर, राजीवनगर आणि जमजम कॉलनी या भागांचा समावेश आहे.घाटपुरी टाकी आणि वामननगर टाकीवरून होणारा पाणीपुरवठा सध्या सात दिवसांआड सुरू आहे. पाणीपुरवठ्याच्या मर्यादित उपलब्धतेमुळे प्रशासनाकडून नियोजनबद्ध वितरण करण्यात येत आहे. त्यामुळे नागरिकांनी पाण्याची साठवण काळजीपूर्वक करावी आणि अनावश्यक वापर टाळावा, असे आवाहन करण्यात आले आहे.नगरपरिषदेकडून नियमित कर भरणाऱ्या नागरिकांना पुरेसा व सुरळीत पाणीपुरवठा मिळावा, यासाठी अवैध नळ जोडण्यांविरोधात मोहीम राबविली जात आहे. प्रशासनाच्या माहितीनुसार, काही भागांमध्ये अनधिकृत जोडण्या आणि मोटारींच्या अतिवापरामुळे मुख्य जलवाहिन्यांवरील दाब कमी होत आहे. यामुळे उंच भागांमध्ये पाणी पोहोचण्यास अडचणी निर्माण होत असून, नियमित ग्राहकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे.

# लाखनवाडा येथे बुध्द जयंतीनिमित्त कॅन्डल मार्च

प्रतिनिधी ८ मे

**खामगाव:** येथे तथागत भगवान बुद्ध यांच्या जयंती निमित्ताने दरवर्षीप्रमाणे यावर्षीही कॅन्डल मार्चचे आयोजन उत्साहात करण्यात आले. 'मंगल मैत्री, सबका मंगल हो' हा संदेश देत ग्रामस्थांनी शांतता, करुणा आणि बंधुभावाचा संदेश दिला.

या कॅन्डल मार्चची सुरुवात कमलशील बुद्ध विहार येथून करण्यात आली. गावातील प्रमुख मार्गाने मार्गक्रमण करत सहभागी नागरिकांनी 'बुद्धम् शरणम् गच्छामि' व 'मंगल मैत्री'चा जयघोष करत वातावरण भक्तिमय केले. त्यानंतर जेतवन बुद्ध विहार येथे पोहोचून त्रिसरण व पंचशील ग्रहण करण्यात आले. यानंतर पुन्हा कॅन्डल मार्च कमलशील बुद्धविहार येथे परत येऊन समारोप करण्यात आला. या कार्यक्रमात कैलास वाकोडे, विलास वाकोडे, सुनील इंगळे, सहदेव वाकोडे, मिलिंद वाकोडे, प्रकाश वानखडे, संतोष वाकोडे, यशवंत सरदार, अतिश वानखडे, सतिष इंगळे, अनिल वानखडे अमोल सरदार, सागर वाकोडे, योगेश वाकोडे, आकाश वाकोडे, नैतिक वाकोडे, चंद्रशेखर वानखडे, जिल्हा युवा पुरस्कार प्राप्त ग्रीन योद्धा पर्यावरण संवर्धक सुमित वाकोडे, यांच्यासह महिला व बालक अनेक नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले. या उपक्रमातून भगवान बुद्धांच्या विचारांचा प्रसार करत समाजात शांतता, समता आणि बंधुभावाची भावना वृद्धिंगत करण्याचा संदेश देण्यात आला.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड

शुक्रवार, दि. ८ मे २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## तोष्णीवाल लेआउट भागातील रोड खोदला !

प्रतिनिधी ८ मे

**अकोला :** शहरातील शिकवणी वर्ग असलेल्या तोष्णीवाल लेआउट बीएसएनएल ऑफीसच्या मागील रस्ता पूर्णपणे खोदण्यात आला आहे. यामुळे विद्यार्थ्यांना पर्यायी मार्गाचा वापर करावा लागत आहे तर परिसरातील नागरिकांना आपले वाहने बाहेरच उभी करून घर गाठावे लागत आहे. विशेष म्हणजे दोन वर्षांपूर्वीच या सिमेंट रोडचे बांधकाम झाल्याचे परिसरातील नागरिकांचे म्हणणे आहे. रस्ता पूर्णपणे खोदल्याने साधे पायी चालणेही कठीण होत आहे. यामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे.

# जिल्ह्यात निवडणुकीचा बिगुल वाजला

## ◆पातूर न. प. मध्ये निवडणूक तर अकोटमध्ये पोट निवडणूक

### पातूर नगर परिषदमध्ये राजकीय हालचालींना वेग अखेर पातूरकरांची प्रतिक्षा संपली

प्रतिनिधी ८ मे

**पातूर :** अकोला जिल्ह्यातील राजकारण पुन्हा एकदा तापण्याची चिन्हे दिसू लागली असून बहुप्रतीक्षित पातूर नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम अखेर जाहीर झाला आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या घोषणेनंतर इच्छुक उमेदवारांनी मोर्चेबांधणी सुरू केली असून गल्लीपासून शहरापर्यंत राजकीय वातावरण चांगलेच ढवळून निघाले आहे.

पातूर नगरपरिषदेची प्रभाग रचना वेळेत पूर्ण न झाल्याने संपूर्ण नगरपरिषदेची निवडणूक नव्याने जाहीर करण्याची वेळ आली. त्यामुळे ही निवडणूक आता सर्वच राजकीय पक्षांसाठी प्रतिष्ठेची ठरणार असून




अनेक इच्छुक उमेदवार मैदानात उतरण्यास सज्ज झाले आहेत. महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मधील कलम १०अ पोटकलम (४) अंतर्गत अधिकारांचा वापर करून हा निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. यासोबतच राज्यातील इतर तीन नगरपरिषदांतील रिक्त पदांसाठी पोटनिवडणुकीचाही कार्यक्रम घोषित करण्यात आला आहे. या निवडणुकीकडे संपूर्ण अकोला जिल्ह्याचे लक्ष लागले असून अनेक दिग्गज नेत्यांची प्रतिष्ठा पणाला लागणार आहे. स्थानिक पातळीवरील विकासकामे, गटबाजी, नाराज कार्यकर्ते तसेच नव्या चेहऱ्यांची एन्ट्री यामुळे निवडणूक अधिक रंगतदार होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. विशेषतः पातूरमध्ये सत्तांतर होणार का, सत्ताधारी पुन्हा सत्ता टिकवणार का, की एखादा नवा गट बाजी मारणार याबाबत नागरिकांमध्ये मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे. दरम्यान, विविध राजकीय पक्षांनी आतापासूनच रणनीती आखण्यास सुरुवात केली असून शहरात बैठका, प्रचारयोजना आणि संभाव्य उमेदवारांच्या नावांची चर्चा रंगू लागली आहे. आगामी काही दिवसांत अकोला जिल्ह्याचे राजकारण आणखी तापणार हे निश्चित मानले जात आहे.

**निवडणूक कार्यक्रम असा :**

जिल्हाधिकाऱ्यांकडून निवडणूक कार्यक्रम जाहीर : १२ मे २०२६
नामनिर्देशनपत्र स्वीकृती कालावधी : १८ मे ते २५ मे २०२६
(सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत)
२३ व २४ मे रोजी सुट्टीमुळे अर्ज स्वीकृती बंद
अंतिम उमेदवार यादी व चिन्ह वाटप : २ जून २०२६
मतदान : २० जून २०२६, सकाळी ७.३० वाजल्यापासून
मतमोजणी व निकाल : २१ जून २०२६ (रविवार)

## अकोट नगर परिषद प्रभाग क्र. ४ साठी पोटनिवडणूक जाहीर

प्रतिनिधी ८ मे

**अकोट :** राज्य निवडणूक आयोगाने महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोग यांच्या माध्यमातून अकोट नगर परिषद मधील प्रभाग क्रमांक ४ मधील रिक्त जागेसाठी पोटनिवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशांच्या अधीन राहून ही निवडणूक प्रक्रिया पार पडणार आहे. अकोट नगर परिषदेमधील दुसऱ्या क्रमांकाची रिक्त जागा भरण्यासाठी ही पोटनिवडणूक घेण्यात येणार असून, निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण तापण्याची शक्यता व्यक्त होत आहे. निवडणूक कार्यक्रमानुसार उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत १८ मे ते २५ मे २०२६ दरम्यान राहणार आहे. २६ मे रोजी नामनिर्देशन पत्रांची छाननी केली जाईल.

**पोटनिवडणुकीचा कार्यक्रम**

नामनिर्देशन पत्र दाखल : १८ ते २५ मे २०२६
नामनिर्देशन पत्र छाननी : २६ मे २०२६
अर्ज मागे घेण्याची मुदत : २७ मे ते २ जून २०२६
चिन्ह वाटप : २ जून २०२६
मतदान : २० जून २०२६
मतमोजणी : २१ जून २०२६

तसेच २७ मे ते २ जून २०२६ दरम्यान उमेदवारांना अर्ज मागे घेता येणार आहेत. २ जून रोजी निवडणूक चिन्हांचे वाटप करण्यात येईल. प्रभाग क्रमांक ४ साठी मतदान प्रक्रिया २० जून २०२६ रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत पार पडणार आहे. त्यानंतर २१ जून रोजी मतमोजणी होऊन निकाल जाहीर केला जाणार आहे.

## ऑटो जाळल्याने मोटरसायकल जाळून घेतला बदला

प्रतिनिधी ८ मे

**अकोला :** जुने शहर पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या महाकाली नगरात दोन गटातील वाद विकोपाला पोहोचल्याचे दिसून येत आहे यावर पोलिसांनी वेळेस आवर न घातल्यास मोठी घटना होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार दोन दिवसाआधी महाकाली नगरातील एका गटातील युवकाचा ऑटो पेटवून देण्यात आला होता. त्याला प्रत्युत्तर म्हणून दुसऱ्या गटाने एक मोटर सायकल जाळून त्याचा बदला घेतल्याचे बोलले जात आहे. भर रस्त्यात ही मोटरसायकल पेटवून देण्यात आली. संपूर्ण मोटर सायकल या घटनेत जळून खाक झाली. या परिसरात कार्यरत अटॅक



गैंग च्या हैदोसाने परिसरातील नागरिक त्रस्त झाले आहेत. या परिसरातील १९ नंबर शाळेजवळील बगीच्यात खुलेआम दारू पिणे, रस्त्याने जाणाऱ्या महिला व मुलींची छेडखानी करणे, रस्त्यावर केक कापून मित्रांचे वाढदिवस साजरे करणे आधी प्रकारात वाढ झालेली आहे. या गॅंगचा उपद्रव पाहता परिसरात एखादी मोठी घटना घडण्याआधी पोलिसांनी या गॅंग चा उचित बंदोबस्त करावा अशी मागणी परिसरातील नागरिक करीत आहेत

## अनोळखी मानवी सांगाड्याची ओळख पटविण्यात यश

### हराळ येथील सोपान खाडे असल्याचे निष्पन्न

प्रतिनिधी ८ मे

**अकोला :** अनिकट भागात सापडलेल्या अनोळखी पुरुषाच्या सांगाड्याची ओळख अवघ्या दोन दिवसांत पटवण्यात सिटी कोतवाली पोलिसांना यश आले.

५ मे रोजी सकाळी तुळजाभवानी मंदिर रोड परिसरातील अनिकट पोलीस लाइनजवळ गोकुळ नावकार यांना एका अनोळखी पुरुषाचा सांगाडा आढळून आला. त्यांनी तत्काळ याबाबतची माहिती सिटी कोतवाली पोलिसांना दिली. सिटी कोतवाली पोलिस स्टेशनचे प्रभारी पोलीस निरीक्षक नितीन लेव्हरकर व पोलीस उपनिरीक्षक अनिल इंगोले हे तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी घटनास्थळाची बारकाईने पाहणी करून मानवी सांगाड्याची माहिती व छायाचित्रे सोशल मीडियाच्या माध्यमातून प्रसारित केली. दरम्यान, पोलिसांनी विविध दृष्टिकोनातून तपास सुरू ठेवला. तपासादरम्यान सदर सांगाडा हा सोपान धोंडबा खाडे (३२) रा. हराळ, ता. रिसोड, जि. वाशिम यांचा असल्याचे निष्पन्न झाले. यानंतर मृतकाचे भाऊ ज्ञानेश्वर धोंडबा खाडे यांना सिटी कोतवाली पोलीस स्टेशन येथे बोलावून मृतकाच्या अंगावरील कपडे दाखविण्यात आले. त्यावेळी त्यांनी सदर सांगाडा हा त्यांचा भाऊ सोपान खाडे याचाच असल्याचे ओळखले. ज्ञानेश्वर खाडे यांनी पोलिसांना दिलेल्या माहितीनुसार, सोपान खाडे यांना उपचारासाठी सुजय पाटील यांच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र उपचार सुरू होण्यापूर्वीच ते तेथून निघून गेले होते. त्यानंतर त्यांचा शोध घेतला असता ते न सापडल्याने पोलीस स्टेशन सिव्हिल लाइन, अकोला येथे २७ एप्रिल रोजी मीसिंगची तक्रार दाखल करण्यात आली होती. अनोळखी मानवी सांगाड्याची ओळख पटविणे हे पोलिसांसमोर मोठे आव्हान होते. मात्र, सिटी कोतवाली पोलिसांनी परिश्रम घेत अत्यंत कमी कालावधीत मृत व्यक्तीची ओळख पटवून तपासात यश मिळविले.

## ढगांच्या मागून वर येणारे तेजस्वी 'संध्याकिरण'...




जेव्हा सूर्य क्षितिजावर खाली असतो, जसे की सूर्योदय किंवा सूर्यास्ताच्या वेळी, आणि त्याचा प्रकाश ढगांमुळे किंवा दूरच्या पर्वतांच्या शिखरांमुळे अंशतः अडवला जातो, तेव्हा प्रकाशाचे हे झोत दिसतात. वातावरणातील धूळ, धूर किंवा पाण्याचे थेंब यांसारख्या लहान कणांमुळे सूर्यप्रकाश विखुरला जातो, त्यामुळे हे किरण दिसू लागतात.

## परदेशात एमबीबीएस शिक्षणासाठी विद्यार्थ्यांचा वाढता कल

### उडाण एड्युटेकतर्फे मार्गदर्शन, पालक व विद्यार्थी झाले खुश





प्रतिनिधी ८ मे

**अकोला :** परदेशात एमबीबीएस शिक्षण घेण्याकडे विद्यार्थ्यांचा वाढता कल पाहता अकोल्यातील उडाण एड्युटेक संस्थेतर्फे विद्यार्थ्यांसाठी विशेष मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले. यावेळी रशिया, जॉर्जिया, कझाकस्तान, किर्गिस्तान यांसारख्या देशांमध्ये वैद्यकीय शिक्षणाच्या उपलब्ध संधी, प्रवेश प्रक्रिया, फी संरचना तसेच विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या सुविधा याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली.

उडाण च्या या कार्यक्रमात विद्यार्थ्यांसह पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शविली. परदेशात शिक्षण घेताना येणाऱ्या अडचणी, व्हिसा प्रक्रिया, राहण्याची व्यवस्था, शिक्षणाची गुणवत्ता आणि भारतातील मान्यता याबाबत तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. उडाण एड्युटेकच्या संचालकांनी सांगितले की, आर्थिकदृष्ट्या परवडणाऱ्या शुल्कात आणि जागतिक दर्जाचे शिक्षण विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्याचा संस्थेचा प्रयत्न आहे. विद्यार्थ्यांना प्रवेशापासून ते परदेशात स्थायिक होईपर्यंत आवश्यक सर्व मदत संस्था पुरवत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. यावेळी अनेक विद्यार्थ्यांनी परदेशातील वैद्यकीय शिक्षणाविषयी उत्सुकता व्यक्त करत विविध प्रश्न उपस्थित केले. मार्गदर्शन सत्रामुळे विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन झाल्याची प्रतिक्रिया उपस्थितांनी व्यक्त केली.

## अशोक वाटिका जवळ अपघातात युवक जखमी

प्रतिनिधी ८ मे

**अकोला :** येथील अशोक वाटिका परिसरात गुरूवारी रात्री १२ वाजताच्या सुमारास ऑटोरिक्षा अनियंत्रित झाल्यामुळे अपघात झाला. यामध्ये एक युवक जखमी झाला. जखमीला रूग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले.



## अवकाळी पाऊस आणि गारपिटीने शेतकरी हवालदिल

### फळबाग, भाजीपाला आणि आंबा पिकांचे मोठे नुकसान

प्रतिनिधी ८ मे

**अकोला :** जिल्ह्यात आज झालेल्या अवकाळी पाऊस आणि गारपिटीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. जिल्ह्यातील अनेक तालुक्यांमध्ये फळबाग, भाजीपाला तसेच आंबा पिकांचे नुकसान झाले असून अकोला तालुक्यातील पातूर नंदापूर येथेही जोरदार गारपीट झाली. अवकाळी पाऊस आणि वादळी वाऱ्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले असून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी तात्काळ पंचनामे करून शासकीय मदत देण्याची मागणी केली आहे.

अकोला जिल्ह्यात अवकाळी पावसाने आणि गारपिटीने पुन्हा एकदा शेतकऱ्यांच्या चिंतेत भर टाकली आहे. अचानक झालेल्या हवामान बदलामुळे जिल्ह्यातील अनेक भागांमध्ये जोरदार पाऊस आणि गारपीट झाली. यामुळे फळबाग, भाजीपाला आणि आंबा पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे चित्र



पाहायला मिळत आहे.अकोला तालुक्यातील पातूर नंदापूर परिसरातही मोठ्या प्रमाणात गारपीट झाली. जोरदार वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसामुळे अनेक ठिकाणी झाडांची पडझड झाली तर शेतातील उभे पीक अक्षरशः जमीनदोस्त झाले. आंबा बागांमधील फळांची मोठ्या प्रमाणात गळती झाली असून भाजीपाला पिकांनाही फटका बसला आहे.अचानक आलेल्या या नैसर्गिक संकटामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला असून आधीच वाढलेल्या उत्पादन खर्चामुळे अडचणीत असलेल्या बळीराजासमोर आता नवीन संकट उभे ठाकले आहे. अनेक शेतकऱ्यांनी प्रशासनाकडे नुकसानग्रस्त शेतीचे तात्काळ पंचनामे करण्याची मागणी केली आहे.दरम्यान शासनाने त्वरित मदत जाहीर करून नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणीही शेतकरी वर्गातून करण्यात येत आहे.

## भीषण उन्हातही स्वस्त मिळत आहे भाजीपाला

### भाजीपाल्याची आवक भरपूर पण ग्राहकी मात्र कमी

प्रतिनिधी ८ मे

**अकोला :** शहरात तापमान ४४ अंश सेल्सिअसच्या जवळ पोहोचल्याने जनजीवन विस्कळीत झाले आहे. याचा थेट परिणाम अकोला शहराच्या मोठ्या भाजी मार्केटवर होत आहे.

तीव्र उष्णता असल्यावरही मार्केटमध्ये भाजीपाल्याचा मुबलक पुरवठा होत आहे, परंतु कडक उन्हामुळे ग्राहक बाजारात फिरकेनासे झाले आहेत. भाजी खराब होण्याच्या भीतीने शेतकरी आणि व्यापाऱ्यांना भाजीपाला कवडीमोल भावाने विकावा लागत आहे.



**बाजाराचे गणित : भाजीपाला लवकर विकण्यासाठी चुरस**

घाऊक व्यापाऱ्यांच्या मते, उष्णतेमुळे भाज्या लवकर सुकतात किंवा सडतात. यामुळे शेतकरी आणि घाऊक व्यापाऱ्यांना आपला माल आणखी कमी किमतीत विकावा लागत आहे. कोबी आणि भोपळ्याची अवस्था इतकी बिकट आहे की त्याकडे कोणी ढुंकूनही पहावयास तयार नसल्याचे दिसून येत आहे

**दुपारपर्यंत भाज्या खराब होतात**

जनता भाजी बाजारातील एका घाऊक व्यापाराच्या मते, शेतकरी भाज्या बाजारात आणण्यापूर्वी त्यांची काढणी करतात. त्या बाजारात पोहोचेपर्यंत २४ तासांपेक्षा जास्त वेळ निघून गेलेला असतो. त्यानंतर सकाळी ११ वाजेपर्यंत त्या बाजारात विकल्या जातात. उष्णतेमुळे भाज्या लवकर खराब होत आहेत, त्यामुळे घाऊक व्यापारी आपला माल शक्य तितक्या लवकर विकण्यास उत्सुक आहेत. या व्यापाराच्या मते, 'उष्णतेमुळे उत्पादन चांगले होत असले तरी, वाहतूक आणि साठवणुकीच्या अभावामुळे शेतकऱ्यांना योग्य भाव मिळत नाही. हवामान थंड होईपर्यंत भाजीपाल्याची बाजारपेठ अस्थिर राहील.'

| भाजी | ठोक भाव | चिल्लर भाव |
|---|---|---|
| ◆ टोमॅटो | १२-१५ | १५-२० |
| ◆ फुलकोबी | ५-६ | १५-२० |
| ◆ पत्ताकोबी | ४-५ | १०-१५ |
| ◆ हिरवी मिरची | २० | ४०-०० |
| ◆ भेंडी | १०-१५ | २०-२५ |
| ◆ वांगे | १०-१५ | १५-२० |
| ◆ भोपळा | ५-१० | १५-२० |
| ◆ परवल | ३५-४० | ६०-०० |
| ◆ गवार | ३०-४० | ६०-७० |
| ◆ दुधी भोपळा | १० | २०-०० |
| ◆ कैरी | ३० | ५०-६० |

## निंभोरा शेतशिवारातून दीड लाखाची ॲल्युमिनियम तारेची चोरी

प्रतिनिधी ८ मे

**तेल्हारा :** तेल्हारा पोलीस स्टेशन अंतर्गत निंभोरा शेतशिवारातील वाघमारे मध्ये असलेल्या इलेक्ट्रिक पोलवरील ॲल्युमिनियमची एकूण २१ गाले तार किंमत अंदाजे १ लाख ५० हजार रुपये अज्ञात इसमाने चोरून नेल्याप्रकरणी फिर्यादी रितेश पुरुषोत्तम वाघोडे (४६) वरिष्ठ तंत्रज्ञ, महाराष्ट्र विद्युत वितरण कंपनी उपविभाग तेल्हारा, शाखा तक्रारीवरून तेल्हारा पोलिसात अज्ञात आरोपीवर गुन्हा दाखल भांबेरी यांच्या लेखी तक्रारीवरून तेल्हारा पोलिसांनी गुरुवारी ७ मे रोजी दुपारी ३ वाजेनंतर अज्ञात आरोपी विरुद्ध तेल्हारा पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. बुधवार ६ मे रोजी फिर्यादीस निंभोरा ता. तेल्हारा येथील अंबादास देवराव रोठे रा. निंभोरा ता. तेल्हारा जि. अकोला यांनी फोनद्वारे माहिती दिली की, निंभोरा शेत शिवारातील वाघमारे डीपी क्र. ४२८२९४९ यांचेमध्ये असलेल्या इलेक्ट्रिक पोलवरील ॲल्युमिनियमची एकूण २१ गाले तार कोणीतरी अज्ञात इसमाने चोरून नेल्याची माहिती दिली होती.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ▪ संपर्क – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK